## एक कोटी ५० लाख शेतकऱ्यांनी घेतला पीक विमा



**मुंबई :** शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य सरकारने एक रुपयांत पीक विमा भरून घेण्याची योजना आणली. यानंतर देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या राज्यातील सर्वाधिक शेतकऱ्यांनी एवढ्या मोठ्या प्रमाणात पीक विमा भरला असल्याची माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. आतापर्यंत एक कोटी ५० लाख शेतकऱ्यांनी एक रुपयात पीक विमा योजनेचा लाभ घेतला असून अडचणीच्या काळात शेतकऱ्यांना पीक विमा भरता यावा, यासाठी राज्य सरकारने त्यांचा प्रीमियम भरण्याची जबाबदारी घेतली आहे. यापेक्षाही अधिक शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, यासाठी पीक विमा भरण्यासाठी तीन दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार असल्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे म्हणाले आहेत.

रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक १६
www.ramprahar.com
# राम प्रहर
बुधवार, २ ऑगस्ट २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

### अंतरंग

'पेणच्या ग्रामीण भागातील सर्व समस्या सोडवणार'/५
चेक बाऊन्सप्रकरणी महिलेस एक वर्षाचा कारावास/७
जिल्हा फुटबॉल स्पर्धेत मुलांच्या गटात 'बालभारती' प्रथम/८

# देशवासीयांच्या सेवेत कोणतीही कसर सोडणार नाही

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मराठीतून भाषण; लोकमान्य टिळक पुरस्कार प्रदान

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या भूमीला मी कोटी कोटी वंदन करतो, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठीत आपल्या भाषणाची सुरुवात केली. लोकमान्य टिळक पुरस्कार अत्यंत महत्त्वाचा आहे. पुण्याच्या पुण्यभूमीत येण्याची मला संधी मिळाली हे माझे भाग्य आहे. पुणे ही टिळक, फुले, चाफेकर या वीरांची भूमी आहे. लोकमान्य टिळक पुरस्कार स्विकारताना मला आनंद होत आहे. देशवासीयांच्या सेवेत, अपेक्षांमध्ये कोणतीही कसर मी सोडणार नाही, अशा भावना या वेळी त्यांनी व्यक्त केल्या.

पुण्यातील सर परशुराम भाऊ महाविद्यालयाच्या मैदानावर हा भव्य सोहळा झाला. या वेळी व्यासपीठावर राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, ज्येष्ठ नेते तथा खासदार शरद पवार, ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. दीपक टिळक, विश्वस्त सुशीलकुमार शिंदे, डॉ. रोहित टिळक, गीताली टिळक, डॉ. प्रणती टिळक आदी उपस्थित होते. स्मृतिचिन्ह, मानपत्र आणि एक लाख रुपये, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या वेळी पंतप्रधान मोदी यांचे स्वागत पुणेरी पगडी, सन्मानपत्र आणि भेट देऊन करण्यात आले. पंतप्रधान मोदींनीही या वेळी उपस्थित नागरिकांशी मराठीतून संवाद साधला. ते म्हणाले, हा माझ्या जीवनातील अविस्मरणीय क्षण आहे. एखादा पुरस्कार जेव्हा मिळतो तेव्हा जबाबदारीदेखील वाढते. हा पुरस्कार



मी १४० कोटी देशवासियांना समर्पित करतो. ज्यांच्या नावात साक्षात गंगा नदीचे नाव आहे. अशा पुरस्काराची रक्कम मी 'नमामि गंगा' या प्रोजेक्टला देण्याचा निर्णय घेतला आहे.

लोकमान्य टिळकांकडे दूरदृष्टी होती. सावरकर तरूण होते, त्या वेळीच टिळकांनी त्यांची क्षमता ओळखली. त्यांची इच्छा होती, सावरकरांनी परदेशात जाऊन शिक्षण घ्यावे. त्यानंतर इथे येऊन स्वातंत्र्य लढ्यात सहभागी व्हावे. लोकमान्य टिळक यांनी वीर सावरकर यांना बॅरिस्टर होण्यासाठी मदत केली. **(पान २ वर..)**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे जगभरातील लोक महत्त्वाचे नेते म्हणून पाहतात ही अभिमानाची गोष्ट आहे. हा पुरस्कार यापूर्वी अनेकांना दिला गेला आहे. ज्यांनी समाजामध्ये चांगले काम केले त्यांना आजपर्यंत देण्यात आला आहे. खासदार शरद पवार यांनादेखील हा पुरस्कार देण्यात आला आहे. जगात प्रसिद्ध असलेल्या पंतप्रधान मोदींना हा पुरस्कार दिल्यामुळे मी टिळक स्मारक ट्रस्ट यांचे आभार मानतो.**
**–एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

**लोकमान्य टिळक पुरस्काराला वेगळे महत्त्व आहे. टिळक स्मारकाने पुरस्कारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदीजींची निवड केली. या पुरस्कारांमध्ये इंदिरा गांधी, खान अब्दुल गफार खान, बाळासाहेब देवरस, शंकर दयाळ शर्मा, अटलबिहारी वाजपेयी, डॉ. मनमोहन सिंह होते. या मान्यवरांच्या पंक्तीत नरेंद्र मोदीजींचा समावेश झाला याचा सर्वांना आनंद झाला. त्यांचे अंत:करणापासून अभिनंदन!**
**–खासदार शरद पवार,**
**अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस**

# ठाकरे गटाला दिलासा नाहीच!

## दोन महत्त्वाच्या प्रकरणांत तातडीने सुनावणीस सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

निवडणूक आयोगाविरोधात दाखल केलेली याचिका आणि आमदार अपात्रतेबाबत अध्यक्षांची निष्क्रियता या दोन प्रकरणात ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली आहे, परंतु या दोन्ही प्रकरणावर तातडीने सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे.

या प्रकरणात सुनावणी करण्यासंदर्भात ठाकरे गटाच्या वकिलांनी मंगळवारी (दि. १) न्यायालयामध्ये मेन्शनिंग केले होते, पण आता सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणावर कोणतीही तारीख दिली नाही. त्यामुळे ही दोन प्रकरणे लांबणीवर पडणार




असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

आमदार अपात्रेबाबत सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांना निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते, परंतु सुनावणीला बराच काळ उलटला तरी विधानसभा अध्यक्षांनी यावर कोणताही निर्णय दिला नव्हता. त्यामुळे ठाकरे गटाने या प्रकरणी पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयामध्ये धाव घेतली होती.

# समृद्धी महामार्ग बांधकामादरम्यान गर्डरसह क्रेन कोसळून अपघात



**१७ कामगारांचा मृत्यू**

**शहापूर : प्रतिनिधी**

इगतपुरी ते मुंबईदरम्यान सुरू असलेल्या हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या बांधकामादरम्यान सरलांबे येथे सोमवारी (दि. ३१) अत्याधुनिक क्रेन कोसळून दुर्घटना झाली होती. या घटनेमध्ये १७ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेप्रकरणी एमएसआरडीसीने माहिती दिली.

सोमवारी रात्री ११.३० वाजता लाँचिंग गर्डर दुसऱ्या दिवसाची पूर्वतयारी करण्यासाठी हलवत असताना क्रेन (सेगमेंट लाँचर) पूर्ण झालेल्या गर्डरसह ३५ मीटर उंचीवरून अचानक कोसळले. या दुर्घटनेत १० कामगार, दोन अभियंते व पाच कर्मचारी असा एकूण १७ जणांचा मृत्यू झाला असून तीन गंभीर जखमी झाले, तर आणखी तीन कामगार हे लाँचरच्या सांगाड्याखाली दबल्याची शक्यता असल्याने त्याचे शोधकार्य सुरू आहे. **(पान २ वर..)**

## निवडक

### हिमाचलमध्ये आढळला दुर्मीळ अल्बिनो जातीचा साप

**हिमाचल :** मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला असतानाच हिमाचलमध्ये एक सफेद रंगाचा साप आढळला आहे. या दुर्मीळ सापाचा व्हिडीओ इंटरनेटवर व्हायरल झाला आहे. लोकांनी हा साप पाहिल्यावर किंग कोब्रा असल्याचे म्हटले परंतु, काही सर्पमित्रांनी या सापाला पाहिल्यानंतर हा अल्बिनो जातीचा साप असल्याची माहिती दिली. हा साप क्वचितच जंगलात दिसतो. याआधी पुण्यात अशा प्रकारचा अल्बिनो साप दिसला होता.

### पुढील सहा दिवस समुद्राला मोठी भरती

**मुंबई :** पुढील सलग सहा दिवस समुद्राला मोठी भरती येणार आहे. या वेळी समुद्रकिनाऱ्यावर पावणेपाच मीटरहून अधिक उंच लाटा उसळणार आहेत. या पावसाळ्यातील समुद्राला सर्वांत मोठी भरती गुरूवारी आणि शुक्रवारी येणार आहे. १ ते ६ ऑगस्टदरम्यान रोज मोठी भरती येणार आहे.

# ३०० औषधांवर आता क्यूआर कोड अनिवार्य

## केंद्र सरकारचा निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बनावट औषधांचा वापर सध्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने देशातील ३०० फार्मा ब्रँडसाठी क्यूआर कोड किंवा बारकोड ठेवणे अनिवार्य केले आहेत. १ ऑगस्टला किंवा त्यानंतर बनवलेल्या औषधांसाठी हे बंधनकारक असणार आहे.

ज्या औषधांवर क्यूआर कोड अनिवार्य करण्यात आले आहेत त्यामध्ये कॅल्पोल, डोलो, सॅरिडॉन, कॉम्बिफ्लॅम आणि अँटीबायोटिक्स अजिथ्रल, ऑगमेंटिन, सेफ्टम, मेफ्टेल ते ॲलर्जीविरोधी औषधे ॲलेग्रा आणि थायरॉईड औषध थायरोनॉर्म यांचा समावेश असणार आहे.

क्यूआर कोडमुळे ट्रॅकिंग आणि ट्रेसिंग करणे सोपे होईल. यामुळे



बॅच रिकॉल आणि बनावट औषधे ओळखण्यातदेखील मदत होईल. या निर्णयामुळे देशातील निकृष्ट किंवा बनावट औषधांच्या विक्रीला आळा घालण्यास मदत होईल, असे औषध उद्योगातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

औषधांवर क्यूआर कोड टाकण्याच्या सूचना गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये जारी करण्यात आल्या होत्या. त्यात म्हटले आहे की, शेड्यूल एच २मध्ये येणाऱ्या औषधांना प्राथमिक पॅकेजिंग लेबलवर बार कोड किंवा सेकंडरी पॅकेज लेबल चिकटवावे लागेल.

## उरण-पनवेल रोडवर अपघातात एकाचा मृत्यू

**उरण : बातमीदार**

उरण-पनवेल मार्गावर मंगळवारी (दि. १) पनवेल तालुक्यातील गव्हाण फाटा येथे घडला. या अपघातामुळे एका प्रवाशीला आपला जीव गमवावा लागला आहे.

पनवेलवरून उरणच्या दिशेने येणाऱ्या इको गाडीला ट्रेलरने धडक दिल्याने उरण-पनवेल मार्गावरील गव्हाण ब्रिजवर भीषण अपघात झाला. ईको गाडीमध्ये पाच प्रवासी बसले होते. यामध्ये ड्रायव्हर व इतर प्रवासी वाचले असून ड्रायव्हर सीटच्या बाजूला बसलेले तेलंगे यांचा मात्र मृत्यू झाला आहे. अपघात इतका भीषण होता की, गाडीच्या एका बाजूचा पूर्णपणे चुरा झाला आहे.

या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात झाली आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# मुख्यमंत्री शिंदे यांनी केली खोपोली घाटातील दरडप्रवण क्षेत्राची पाहणी

**खोपोली : प्रतिनिधी**

मागील आठवड्यात मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर आडोशी बोगद्याजवळ दरड कोसळून वाहतूक ठप्प झाली होती. त्या आडोशी बोगद्याची व परिसरातील दरडप्रवण भागाची सोमवारी (दि. ३१) रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाहणी करून एमएसआरडीसी अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुणे येथील दौऱ्यानिमित्त पुण्याला जाताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खोपोली घाटातील आडोशी बोगद्याजवळील दरडप्रवण क्षेत्राची थांबून पाहणी केली. या वेळी एमएसआरडीसी, आयआरबी त्याचप्रमाणे पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर नऊ किमीचे घाटक्षेत्र असून या ठिकाणी अपघात टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत आयआयटी मुंबई या संस्थेला सांगितले असून काम सुरूही झाले आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. दरड कोसळून दुर्घटना घडलेल्या ठिकाणच्या डोंगरावर एमएसआरडीसीने संरक्षक जाळी लावली असून हा परिसर सुरक्षित केला आहे. अलिकडेच कामशेत बोगद्याजवळ कोसळलेल्या दरड भागाची मुख्यमंत्री शिंदे यांनी पाहणी करीत माहिती घेतली.

ज्या ठिकाणी डोंगराचा भाग धोकादायक असेल तो भाग पाडून संरक्षक जाळी टाकून हा भाग सुरक्षित करण्याचे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी अधिकाऱ्यांना दिले.

# कोकण, पश्चिम घाटमाथ्यावरील नुकसानीचा आढावा घ्यावा -भाजप उपाध्यक्ष माधव भांडारी

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकणातील तसेच पुणे, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यातील घाटमाथ्यावरील भागात अतिवृष्टी, पुरामुळे भातशेतीचे नुकसान झाल्याने राज्य शासनाने या भागातील भातशेतीची पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा देणारी पावले उचलावीत, अशी मागणी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी यांनी राज्य शासनाकडे केली आहे. या संदर्भात भांडारी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषीमंत्री धनंजय मुंडे यांना पत्र पाठविले आहे.

भांडारी यांनी पत्रात म्हटले आहे की, २६ ते ३० जुलै या पाच दिवसांमध्ये मी सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात असल्याने तेथे अतिवृष्टीमुळे भातशेतीच्या झालेल्या स्थितीबाबत राज्य शासनाचे काही गोष्टींकडे लक्ष वेधणे आवश्यक बनले आहे. यावर्षी पाऊस उशिरा



सुरू झाल्यामुळे कोकण व पश्चिम घाटमाथ्यावर भातपेरण्या उशिरा झाल्या. त्यामुळे लावण्याही लांबणीवर गेल्या. गेल्या आठवड्यात लावण्यांना गती मिळाली होती. याच काळात अतिवृष्टी झाल्यामुळे लावण्या पूर्ण होऊ शकल्या नाहीत. तयार केलेली भात रोपे मोठ्या प्रमाणावर वाया गेली आहेत.

पुरामुळे अनेक शेतात पुराबरोबर वाहून आलेला गाळ भरला आहे तर अनेक ठिकाणी दरडी घसरून शेती मातीखाली गेली असल्याने भातशेतीचे नैसर्गिक चक्र पूर्णपणे विस्कटलेले आहे. आता भाताचे पीक कोकणातील शेतकऱ्याच्या हाती येण्याची शक्यता फार कमी आहे.

रायगड, ठाणे जिल्ह्यात तसेच कोल्हापूर व सातारा जिल्ह्यांच्या घाटमाथ्यावरील तांदूळ उत्पादक भागातही अशीच परिस्थिती आहे. शासनाने कोकण व घाटमाथ्यावरील तांदूळ उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणींची दखल तातडीने घ्यावी. त्यासाठी संपूर्ण कोकण, कोल्हापूर ते पुणे घाटमाथा ह्या भागातील भातशेतीची प्रत्यक्ष पाहणी करून वस्तूस्थिती स्पष्ट करणारा आढावा घेण्याबाबत घ्यावा व त्याच्या आधारे आवश्यकता असेल त्याप्रमाणे कोकण, पश्चिम घाटमाथ्यावरील तांदूळ उत्पादक शेतकऱ्याला दिलासा देणारी पावले उचलावीत, असेही माधव भांडारी यांनी या पत्रात नमूद केले आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेलमध्ये शास्त्रीय, उपशास्त्रीय गायन कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त नादब्रम्ह साधना मंडळ खारघर व पनवेल सांस्कृतिक सेलच्या विद्यमाने शनिवारी (दि. ५) शास्त्रीय व उपशास्त्रीय गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, भजनसम्राट रायगड भूषण हभप निवृत्तीबुवा चौधरी, सिडको युनियनचे सेक्रेटरी जे. टी. पाटील, सांस्कृतिक सेलचे जिल्हा संयोजक अभिषेक पटवर्धन, हभप नंदकुमार कर्वे यांची उपस्थिती लाभणार आहे. **(पान २ वर..)**

### पुष्पगुच्छ, भेटवस्तू तसेच बॅनरबाजी नको –आमदार प्रशांत ठाकूर

माझ्या वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ, भेटवस्तू तसेच बॅनरबाजी करू नये, त्याऐवजी सामाजिक सेवाकार्यात योगदान द्यावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांचा ५ ऑगस्ट रोजी वाढदिवस आहे. वाढदिवसाला हजारोंच्या संख्येने हितचिंतक शुभेच्छा देत असतात. अशा वेळी पुष्पगुच्छ, भेटवस्तू त्याचबरोबर बॅनरद्वारे शुभेच्छा दिल्या जातात. तसे न करता वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ, भेटवस्तू तसेच बॅनरबाजी करू नये, त्याऐवजी सामाजिक सेवाकार्यात योगदान द्यावे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आवाहन केले आहे.

### शनिवारी गीतरामायण

जाणीव एक सामाजिक संस्थेच्या वतीने शनिवारी (दि. ५) सायंकाळी ६ वाजता प्रभू श्रीरामचंद्रांच्या चरित्रावर आधारित सामगंध प्रस्तुत गीतरामायण कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून प्रवेशिका माजी नगरसेवक नितीन पाटील यांचे जनसंपर्क कार्यालय, लोंढे खानावळ आणि अमोल खेर स्टेशनरी टिळक रोड या ठिकाणी उपलब्ध आहेत. या कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन नितीन पाटील यांनी केले आहे.

# बालसंगोपन योजनेच्या लाभासाठी पाठपुरावा करणार

## राज्य बालहक्क संरक्षण आयोग अध्यक्ष ॲड. सुशिबेन शाह यांचे आश्वासन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

इर्शाळवाडी येथील दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेमध्ये ० ते १८ वयोगटातील २२ बालके अनाथ झालेली आहेत. या बालकांना विशेष बाब म्हणून महिला व बालविकास विभागाच्या बालसंगोपन योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आयोगामार्फत पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा ॲड. सुशिबेन शाह यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष ॲड. सुशिबेन शाह यांनी मंगळवारी (दि. १) तात्पुरते निवारा केंद्र येथे भेट दिली. दुर्घटनेतील बाधित कुटुंब, अनाथ बालक व त्यांच्या नातेवाईक यांची विचारपूस केली.

या दुर्घटनेमध्ये ० ते १८ वयोगटातील २२ बालके अनाथ झाली आहेत. ही बालके व त्यांचे अन्य कुटुंबिय सद्यस्थितीत चौक ग्रामपंचायत अंतर्गत उभारण्यात आलेल्या निवास व्यवस्थेमध्ये राहात आहेत. या बालकांमध्ये बहुतांश बालके ही आदिवासी विभाग अंतर्गत चिखले, माणगाव, डोलवली येथील निवासी आश्रम शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत.

ही बालके जरी आश्रमशाळेत शिक्षण घेत आहेत या बालकांना बालसंगोपन योजना लागू करण्याबाबत आयोगामार्फत पाठपुरावा करण्यात येणार आहे, तसेच जी बालके शाळेत शिक्षण घेत नाहीत अथवा त्यांनी काही कारणास्तव शालेय शिक्षण अर्धवट सोडलेले आहे, अशा शाळाबाह्य बालकांसाठी व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षणाची सोय खासगी स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयाने करण्यासाठी बाल हक्क आयोग प्रयत्नशील असल्याचे ॲड. शहा यांनी सांगितले.

आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट अंतर्गत एमपावर माईंड्स या विशेष उपक्रमांतर्गत सदर बालकांसाठी समुपदेशन तसेच इतर सामाजिक मानसिक घटकांच्या अनुषंगाने प्रथमतः सहा महिन्यांचा कार्यक्रम निश्चित करण्यात येणार आहे. या विषयाच्या अनुषंगाने विभागाचे प्रतिनिधींनी योगासमवेत मंगळवारी तिथे भेट दिली. भेटीदरम्यान बालकांचे लसीकरण, त्यांना आवश्यक असणाऱ्या इतर बाबी याबाबतही माहिती घेण्यात आली.

या भेटीच्या वेळी आयोगातील सदस्य ॲड. नीलिमा चव्हाण, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी रायगड विनीत म्हात्रे यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## महसूल विभाग हे विकासात्मक प्रशासन –विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महसूल विभाग हे विकासात्मक प्रशासन आहे. महसूल अधिकाऱ्यांच्या डिक्शनरीत 'नाही' हा शब्द नसतो. कोणत्याही परिस्थितीत ते तत्परतेने काम करतात. महसूल विभाग वेगवेगळे असे शेकडो विषय एकाच वेळी हाताळतो, प्रत्येक विषय जबाबदारीने पूर्ण करत असल्याचे, प्रतिपादन कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी महसूल दिनानिमित्त केले.

महसूल विभागामार्फत राज्यात १ ऑगस्ट हा महसूल दिन साजरा करण्याबरोबरच १ ते ७ ऑगस्ट २०२३ या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहाचा शुभारंभ आयुक्त डॉ. कल्याणकर यांच्या हस्ते झाला त्यावेळी ते बोलत होते.

प्रमुख वक्ते म्हणून शिवचरित्र पुस्तकाचे लेखक शिवव्याख्याते प्रशांत देशमुख, उपायुक्त (महसूल) विवेक गायकवाड, उपायुक्त (सामान्य प्रशासन) मनोज रानडे, उपायुक्त (विकास) गिरिष भालेराव, उपायुक्त (रो.ह.यो.) अजित साखरे, उपायुक्त (पुरवठा) लिलाधर दुफारे, उपायुक्त (पुनर्वसन), रिता मैत्रेवार, उपायुक्त (नगर पालिका) रवींद्र जाधव, उपायुक्त (विकास आस्थापना) मिनल कुटे, कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, सहायक संचालक संजिवनी जाधव–पाटील तसेच महसूल विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी महसूल विभागात उत्कृष्ट काम करणारे नायब तहसीलदार माधुरी डोंगरे, अव्वल कारकून अनिता राठोड, सोनाली मिरजे, अव्वल कारकून कार्तिकी पाटील, हमाल प्रदिप भोसले, उद्वाहक रमेश कातकरी, शिपाई संजय मोरे, वाहनचालक सतिश देसाई, लघुलेखक सुनिल वाघ या अधिकारी कर्मचाऱ्यांचा आयुक्त डॉ. कल्याणकर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्तावीक उपायुक्त (सामान्य प्रशासन) मनोज रानडे यांनी केले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्टार्टअप आयडियाज् स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात वित्त व लेखा विभागातर्फे मंगळवारी (दि. १) स्टार्टअप आयडियाज् स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेच्या माध्यमातून महाविद्यालयातील वित्त व लेखा विभागातील विद्यार्थी विद्यार्थिनींमध्ये नवनवीन व्यावसायिक कल्पना, कला, कौशल्ये, गुंतवणूकदार, व्यवसायाचे नियोजन, भांडवल, नफा व व्यवसाय कसा करावा याविषयी जागरूकता निर्माण केली.



या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील वित्त व लेखा विभागातील सुमारे ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व त्यांच्या अंतर्गत व्यावसायिक कलागुणांचे व वेगवेगळ्या कल्पनांचे सादरीकरण केले.

या सर्व स्पर्धकांनी त्यांच्या व्यावसायिक कल्पनांचे उत्तमरित्या सादरीकरण करून सतेन खुशवाला याने प्रथम क्रमांक पटकाविला, तसेच सुजल रोहीलकर याने द्वितीय क्रमांक पटकाविला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी सर्व स्पर्धकांना प्रोत्साहन दिले व मोलाचे मार्गदर्शन केले तसेच क्रमांक पटकाविलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. रीत ठुले यांनी उपस्थित राहून महत्त्वाची भूमिका बजावली.

या स्पर्धेचे आयोजन वित्त व लेखा विभाग प्रमुख प्रा. प्रवर शर्मा यांनी केले व प्रा. योगिता पाटील, प्रा. तनुजा सुमन, प्रा. करिष्मा कडव व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## योगा शिक्षिकेला लाखोंचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

ऑनलाइन रिव्ह्यू व क्रिप्टो करन्सीच्या नावाने पैसे मिळवून देण्याचे आमिष दाखवून योगा शिक्षिकेची सहा लाख ३५ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे.

खारघर सेक्टर ७मध्ये राहणाऱ्या २८ वर्षीय योगा शिक्षिकेला एक व्हॉट्सॲप मॅसेज प्राप्त झाला. मॅडिसन ओल्ड इंडिया कंपनीसाठी काम करत असल्याचे सांगून, तुम्ही गुगल रिव्ह्यूसाठी काम केल्यास प्रत्येक रिव्ह्यूसाठी १५० रुपये मिळतील, असे सांगितले होते. त्यासाठी टेलीग्राम हे ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले होते. सुरुवातीला मोबदला म्हणून पैसे देण्यात आले. विश्वास संपादन केल्यानंतर क्रिप्टो करन्सी वेबसाईटवर रजिस्टर करून पैसे गुंतविल्यास जादा पैसे मिळवून देण्याचे आमिष दाखविले. सुरुवातीला पाच हजार रुपये गुंतविले.

गुन्हे

यानंतर खात्यावर अधिकचा नफा दिसू लागला. ते पैसे काढून घेताना तीन टास्क पूर्ण करण्याची अट घालण्यात आली. १५ जुलै ते १८ जुलैच्या दरम्यान सहा लाख ३५ हजार रुपये पाठविले, परंतु त्याचा मोबदला मिळाला नाही. वारंवार प्रयत्न करुनही प्रतिसाद मिळत नसल्यामुळे फसवणूक झाल्याची खात्री योगा शिक्षिकेला झाली. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यामध्ये अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## विशेष मिशन इंद्रधनुष्य लसीकरण मोहीम यशस्वी करा –जिल्हाधिकारी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

विशेष मिशन इंद्रधनुष्य ५.० अंतर्गत जिल्ह्याच्या नागरी व ग्रामीण भागात पुढील तीन महिन्यात झिरो ते दोन वर्ष, दोन ते पाच वर्षे वयोगटातील एकही बालक तसेच गर्भवती महिला लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी आरोग्य यंत्रणांनी दक्ष राहून मोहीम राबवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित विशेष मिशन इंद्रधनुष्य ५.० अंतर्गत नियमित लसीकरण आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. प्रताप शिंदे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कटारे तसेच समिती सदस्य उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यात तीन टप्प्यात ही मोहीम राबविण्यात येणार आहे. पहिला टप्पा ७ ते १२ ऑगस्ट, दुसरा टप्पा ११ ते १६ सप्टेंबर तर तिसरा टप्पा ९ ते १४ ऑक्टोबरदरम्यान राबविण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यात लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबवावी. ग्रामीण व शहरी भागातील सर्व बालक व गर्भवती महिला यांचे लसीकरण १०० टक्के होईल, यासाठी सूक्ष्म नियोजन करावे.

आतापर्यंत एकही डोस न घेतलेले बालक तसेच पूर्ण डोस न घेतलेले बालक याचा शोध घ्यावा. ही मोहीम महानगरपालिका क्षेत्र व नगरपालिका क्षेत्रात अत्यंत प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधितांनी दक्षता घ्यावी, अशा सूचनाही डॉ. म्हसे यांनी या वेळी दिल्या.

मिशन इंद्रधनुष्य अंतर्गत ग्रामीण भागातील बालके व गर्भवती महिलांना या मोहिमेच्या कालावधीत १०० टक्के लसीकरण करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने प्रयत्न करावेत, अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केल्या.



## पान १ वरून

### 'देशवासियांच्या सेवेत कोणतीही कसर सोडणार नाही'

लोकमान्य टिळक आपल्या माथ्याचे 'टिळक' आहेत. ही पुण्यभूमी छत्रपती शिवाजी महाराज, चाफेकर बंधूंची पवित्र धरती आहे, तसेच ती ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांची आदर्श भूमी आहे. त्यामुळे पुण्याच्या धरतीवर येण्याची संधी मला मिळाली हे माझे भाग्य आहे. पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, अनेक संस्था टिळकांनी सुरू केल्या आणि परंपरादेखील सुरू केल्या. सार्वजनिक गणपती महोत्सव सुरू केलाच तसेच त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यासही सुरुवात केली. टिळकांच्या आवाहनानंतर दगडूशेठ पहिले व्यक्ती होते, ज्यांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार मिळणे, ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे, मी हृदयातून आभार व्यक्त करतो. काशी आणि पुणे या शहरांची देशात विशेष ओळख आहे. या भूमीमध्ये माझा सन्मान होणे माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे.

**जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेते नरेंद्र मोदी यांनीच पहिल्या मेट्रोचे उद्घाटन केले आणि आज दुसऱ्या टप्प्याचेही उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात येत आहे, ही मोठी गोष्ट आहे. पहिल्या टप्प्याच्या उद्घाटनाच्या वेळी अजित पवार, एकनाथ शिंदे आणि मी होतो, मात्र त्या वेळी आम्ही वेगवेगळ्या भूमिकेत होतो. आता सगळ्यांच्या विकासासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. पुणे ही जशी उद्योग नगरी आहे तशीच स्वप्न पूर्ण करणारी नगरी म्हणूनही आम्ही पुण्याचा विकास करू. पुणे हे राज्यातीलच नाही तर देशातील सर्वोत्तम शहर करून दाखवू.**

**–देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

**पंतप्रधान मोदी हे राज्याच्या विकाससाठी कायम मदत करतात. त्याचा फायदा राज्यातील १४ कोटी जनतेला होत आहे. ही कामे सुरू असताना अनेक अडचणी आल्या, पण पुणेकरांनी ही कामे पूर्णत्वाला नेण्यासाठी मदत केली आहे. त्याबद्दल सर्व जनतेचे मनापासून आभार! मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाखाली देवेंद्र फडणवीस आणि मी महाराष्ट्राच्या विकासासाठी वेगाने काम करीत आहोत, तसेच आमचे ट्रिपल इंजिनचे सरकार राज्याच्या जनतेच्या हितासाठी काम करीत आहे.**

**–अजित पवार, उपमुख्यमंत्री**

**विविध विकासकामांचे उद्घाटन :** *पिंपरी–चिंचवड आणि पुण्याला जोडणाऱ्या फुगेवाडी ते सिव्हिल कोर्ट आणि रुबी हॉल ते गरवारे या दोन मार्गिका महत्त्वाच्या मानल्या जातात. पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील दोन मार्गिकांचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. मेट्रोचे किमान भाडे १० रुपये असून कमाल भाडे ३५ रुपये असणार आहे. पीसीएमसी ते वनाझ असा प्रवास करण्यासाठी ४० मिनिटे लागणार आहेत आणि त्यासाठी ३५ रुपये भाडे लागेल, तसेच पीसीएमसी ते रुबी हॉल यासाठी ३० रुपये भाडे असेल. वनाझ ते रुबी हॉल यासाठी ३५ रुपये भाडे असेल. विद्यार्थ्यांसाठी भाड्यामध्ये ३० टक्के सवलत असणार आहे. शनिवार, रविवार सर्व नागरिकांसाठी ३० टक्के सवलत असणार आहे, तसेच मेट्रो कार्ड धारकांसाठी सरसकट १० टक्के सवलत असणार आहे. मेट्रो कार्ड लवकरच विक्रीस उपलब्ध होणार आहे. यासोबतच वेस्ट टू एनर्जी मशिचे उद्घाटनही झाले. पुणे महापालिकेने पंतप्रधान आवास योजनेंतर्गत दोन हजार ६५८ घरांचे लोकार्पण त्यांच्या हस्ते करण्यात आले. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून बांधण्यात येणाऱ्या ६४००हून अधिक घरांची पायाभरणीदेखील पंतप्रधानांच्या हस्ते झाली.*

**महाराष्ट्राचा विकास झाला तरच देशाचा विकास होईल :** *मध्यमवर्गीयांचे जीवनमान उंचाविण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. पुण्यातही चांगल्या सुविधा देऊन लोकांना बदलेल्या विश्वात नेले जात आहे. पुण्यातील प्रदूषण कमी करण्यासाठी मेट्रो गरजेची आहे. त्यासाठी सरकार जोरदार प्रयत्न करीत आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी मेट्रोचे जाळे विस्तारले जात आहे. देशाला आत्मनिर्भर बनवण्यासाठी काम सुरू आहे. लोकांवर सरकार विश्वास ठेवत आहे. त्यामुळे लोक देशाच्या विकासासाठी पुढे येत आहेत. लोकांचाही सर्वाधिक विश्वास भारत सरकारवर आहे. जगदेखील भारताकडे आशेने बघत आहे. एकीकडे महाराष्ट्राचा विकास होत आहे. महाराष्ट्राचा विकास होईल, तेव्हाच भारताचा देश विकास होईल. भारताच्या विकासातून महाराष्ट्राच्या वाट्याला सारे काही येणार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सांगितले.*

### समृद्धी महामार्ग बांधकामादरम्यान क्रेन कोसळून अपघात

या दुर्दैवी अपघाताबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुःख व्यक्त केले आहे. या दुर्घटनेत मृत कामगारांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपये मदतीची घोषणा करून जखमींवर तातडीने शासकीय खर्चाने योग्य ते उपचार करावेत, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. अपघाताची सखोल चौकशी करण्यात येणार असून राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथक या ठिकाणी पोहचले.

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेलमध्ये शास्त्रीय व उपशास्त्रीय गायन कार्यक्रम

या कार्यक्रमात प्रख्यात गायक रायगड भूषण उमेश चौधरी यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. त्यांना हार्मोनियमवर नंदकुमार कर्वे तर तबल्यावर महेश कानोले साथ देणार आहेत, तर 'सूर नवा ध्यास नवा' फेम गायिका रश्मी मोघे यांचे उपशास्त्रीय गायन होणार असून त्यांना हार्मोनियमवर सिद्धार्थ जोशी, तबल्यावर किशोर पांडे, पखवाजवर मधुकर धोंगडे, साईट रिदम विशाल वाघमारे आणि झांजवर जगदीश म्हात्रे यांची साथ असणार आहे. त्यानंतर या कार्यक्रमाचा समारोप हभप निवृत्तीबुवा चौधरी यांच्या अभंगवाणीने होणार आहे. त्यांना वसंतशेठ पाटील, शंकर म्हात्रे, नारायणबुवा पाटील, कृष्णा पवार, मोतीराम कडू, जितेंद्र म्हात्रे, मच्छिंद्र पाटील व नादब्रम्ह साधना मंडळ शिष्य परिवाराची साथ लाभणार आहे. या कार्यक्रमाचा संगीतप्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजक अक्षय चौधरी व वैभव चौधरी यांनी केले आहे.

## रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेजमध्ये अकरावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि. १) ११वीच्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या प्रमुखपदी प्राचार्य निशा नायर होत्या. या स्वागत समारंभाच्या कार्यक्रमास १२वीच्या वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या वेगवेगळ्या कल्पना वापरून स्वागताची तयारी केली होती. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेस वंदन करून विद्यार्थ्यांना उपहार देऊन विद्यालयात स्वागत करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व



शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाकरिता संस्थेचे चेअरमन माजी खासदार रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. गडदे यांनी शुभेच्छा दिल्या.

## रानसई येथे महसूल दिनानिमित्त विविध उपक्रम

**उरण : प्रतिनिधी**

उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांचे मार्गदर्शनाखाली महसूल दिनानिमित्त उरण तालुक्यातील दुर्गम अशा रानसई येथील आदिवासींना चिरनेर तलाठी कार्यालयाच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात आले.

यात सातबारा व ८ अ उताऱ्यांचे वाटपासह संजय गांधी निराधार योजना, राष्ट्रीय निराधार योजना, सलोखा योजना, रेशनकार्ड, आधारकार्ड व ई हक्क प्रणालीबाबतची माहिती देण्यात आली. त्याच प्रमाणे यंदा १८ व १९ जुलै रोजी पुरामध्ये नुकसान झालेल्या शेतीच्या नुकसानीबाबत मार्गदर्शन करून नुकसान झालेल्या भातशेतीचे पंचनामे करण्यात आले.



या महसूल दिन कार्यक्रमाचे औचित्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. या वेळी शालेय विद्यार्थी आणि आदिवासींना खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी कोप्रोलीचे मंडळ अधिकारी सी. आर. पाटील, रानसईच्या सरपंच राधा पारधी, चिरनेरचे तलाठी के. डी. मोहिते उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य ग्रामसेवक व्ही. आर. म्हात्रे प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता म्हात्रे, शिक्षिका जानवी कडू व कोतवाल नथुराम कातकरी यांच्यासह रानसई आदिवासी कोड्यांचीवाडी येथील ग्रामस्थ व शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

# पनवेल तालुक्यात महसूल सप्ताह सुरू

## सर्व उपक्रमांचा लाभ घेण्याचे नागरिकांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनतेशी थेट समन्वय साधणारा विभाग म्हणजे महसूल प्रशासन होय. नागरिकांना विविध प्रशासकीय यंत्रणांशी जोडण्यासाठी महसूल प्रशासन महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे महसूल प्रशासनाला प्रशासनाचा कणा समजला जातो. महसूल प्रशासन जनतेविषयी अत्यंत संवेदनशील असून महसूल प्रशासन हे शासनाची प्रतिमा आहे, असे प्रतिपादन पनवेल प्रांताधिकारी राहुल मुंडके यांनी केले. पनवेल तहसीलदार कार्यालयात महसूल सप्ताहाच्या उद्घाटनावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



महाराष्ट्र शासन महसूल विभाग व वन विभाग यांच्या वतीने १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या दरम्यान महसूल सप्ताह साजरा करण्यात येतो. या अनुषंगाने रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात महसूल सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. महसूल विभागामार्फत ज्या विविध सेवा सर्वसामान्य जनतेला दिल्या जातात त्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी व शासनाबद्दल व शासनाच्या कामांबद्दल नागरिकांचा विश्वास वृद्धिंगत व्हावा या उद्देशाने महसूल सप्ताह साजरा करण्यात येतो.

नागरिकांसाठी वर्षभर महसूल प्रशासन कटिबद्ध असते; परंतु महसूल सप्ताहअंतर्गत नागरिकांना विविध शासकीय योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी तसेच नागरिकांची प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी शासन व प्रशासन यांच्यात योग्य समन्वय साधून सर्वसामान्य जनतेच्या कामांचा लवकरात लवकर निपटारा करण्यासाठी महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. महसूल सप्ताहअंतर्गत मंगळवारी (दि.१ ऑगस्ट) पनवेल तहसीलदार कार्यालयात 'महसूल सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला.

उद्घाटनावेळी प्रातिनिधीक स्वरूपात नागरिकांना विविध सेवांचे लाभ देण्यात आले. यामध्ये विद्यार्थी व लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे वाटपही करण्यात आले. याप्रसंगी पनवेल प्रांताधिकारी राहुल मुंडके, तहसीलदार विजय पाटील, निवासी नायब तहसीलदार संभाजी शेलार, नायब तहसीलदार राजश्री जोगी, नायब तहसीलदार (संजय गांधी शाखा) विनोद लचके, सर्व मंडळ अधिकारी, तलाठी, अव्वल कारकून, महसूल सहाय्यक, कोतवाल, लाभार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महसूल सप्ताहांतर्गत पनवेल तालुक्यात राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार विजय पाटील यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नायब तहसीलदार विनोद लचके यांनी केले, आभार प्रदर्शन व कार्यक्रमाचे नियोजन निवासी नायब तहसीलदार संभाजी शेलार व नायब तहसीलदार राजश्री जोगी यांनी केले.

### असे होणार आहेत कार्यक्रम

*पनवेल तालुक्यात मंगळवार १ ऑगस्टपासून महसूल दिन शुभारंभ करण्यात आला असून २ ऑगस्ट रोजी युवा संवाद, ३ ऑगस्ट 'एक हात मदतीचा', ४ ऑगस्ट 'जनसंवाद', ५ ऑगस्ट 'सैनिक हो तुमच्यासाठी', ६ ऑगस्ट 'महसूल संवर्गातील कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी संवाद' तर ७ ऑगस्ट रोजी 'महसूल प्रशासनात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार' व 'वेळोवेळी महसूल प्रशासनाला मदत करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचाही गुणगौरव' करुन महसूल सप्ताहाची सांगता करण्यात येणार आहे.*

## कामोठ्यात महिलांसाठी मोफत सरकारी कोर्स



(छाया : प्रफुल्ल कांबळे)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संस्कार महिला संस्था कामोठे मार्फत आणि पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांसाठी मोफत सरकारी प्रमाणपत्र आणि तीन महिन्यांचे मोफत ब्युटी पार्लर, शिलाई कोर्स सुरू करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन कामोठे येथील जनसंपर्क कार्यालयात बळीराम दगडू म्हात्रे आणि पदीबाई म्हात्रे यांच्या हस्ते झाले.

संस्थेच्या अध्यक्षा तथा माजी नगरसेविका कुसुम रवींद्र म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला माजी नगरसेविका पुष्पा कुत्तरवडे, अरुणा भगत, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र म्हात्रे, मनीषा वनवे, वर्षा शेलार, सुरेखा लांडे, सेक्रेटरी संजना पारकर, सदस्य नारायण भोईर, लक्ष्मण जलोरा, सलमा शेख, अंकिता पाटील, नलिनाक्षी देवाडिगा, विनया म्हात्रे, शुभांगी काळे, रिद्धी पाटील, पूनम देवी, सोनाली म्हात्रे, सविता आसोळे, सलोनी ठाकूर, भक्ती म्हात्रे, पायल येवले, दिव्या जाधव, सुरेखा जायभाजे, श्रुतिका म्हात्रे, हर्षाली म्हात्रे, सपना म्हात्रे, श्रेया म्हात्रे, प्रीती पावणेकर, प्रतीक्षा पावणेकर, प्रियांका शिंदे, आशाराणी पाटील, पायल पाटील, उज्वला गाढवे, कविता म्हात्रे, अंजना पावणेकर, स्वाती पावणेकर, निकिता म्हात्रे, अदिती पोपटा, प्राची गोसावी, उर्मिला पाटील, शितल डुबल, मनाली म्हात्रे, करिष्मा पडवळे, सानिका म्हात्रे आदी उपस्थित होते.







**पनवेल : भाजपचे वांगणी तर्फे वाजे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच गुरुनाथ भोईर आणि आदई ग्रामपंचायतीचे माजी सदस्य राजेश काकडे तसेच बोर्ले ग्रुप ग्रामपंचायत सदस्य तथा शक्ती केंद्र प्रमुख घनश्याम महादेव पाटील यांना वाढदिवसानिमित्त भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी जि. प. अमित जाधव, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, माजी सरपंच रामशेठ पाटील, संतोष शेळके, उपसरपंच प्रवीण म्हात्रे, गणेश पाटील, नितीन मोरे, के. सी. पाटील गुरुजी, अशोक आंबेकर, निलेश पाटील, जयेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील आदी उपस्थित होते.**



**पनवेल : तळोजा मजकूर येथील भाजप शक्ती केंद्र प्रमुख संतोष पाटील यांच्या नवीन गाडीचे पूजन भाजप मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी उमेश चौधरी, नारायण पाटील, स्वप्नील ठाकूर आदी उपस्थित होते.**

## खारघर येथे फोर्टिस मेडिकल सेंटर सुरू

**पनवेल :** खारघरमधील, तसेच बेलापूर व कळंबोलीच्या आसपासच्या भागांमधील रूग्णांना आता त्यांच्या वैद्यकीय गरजांसाठी सर्वांगीण केअर सुविधा मिळणार आहे, कारण वाशी येथील फोर्टिस नेटवर्क हॉस्पिटल हिरानंदानी हॉस्पिटलने खारघरमध्ये 'फोर्टिस मेडिकल सेंटर'चे उद्घाटन केले आहे. हा बाह्य-रूग्ण विभाग खारघर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलसोबत सहयोगाने उभारण्यात आला आहे आणि आज महाराष्ट्रातील फोर्टिस हॉस्पिटल्सच्या व्यवसाय प्रमुख डॉ. एस. नारायणी आणि वाशी येथील फोर्टिस नेटवर्क हॉस्पिटल हिरानंदानी हॉस्पिटलचे फॅसिलिटी डायरेक्टर नितीन कमारिया यांच्या हस्ते याचे उद्घाटन करण्यात आले.

## प्रवीण काळबागे यांची नियुक्ती

**उरण : रामप्रहर वृत्त**



आगामी विधानसभा निवडणुक प्रमुख अरुणशेठ भगत यांच्या सुचनेनुसार उरण विधानसभा महाविजय २०२४ व्यवस्थापन समितीची घोषणा करण्यात आली. यामध्ये प्रचार व प्रसार सभा प्रमुखपदी प्रवीण काळबागे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्तीबद्दल काळबागे यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांचे आभार मानले आहेत.

# लोकमान्य टिळक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना ठिकठिकाणी अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विश्वविख्यायात साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्याा जयंतीनिमित्त व भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त मंगळवारी (दि. १) विनम्र अभिवादन करण्यात आले.

या वेळी विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते तसेच रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर तसेच ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख आदरणीय प्रा. बाबुलाल पाटोळे, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, सागर रंधवे व कार्यक्रमाच्या सहायक हर्षला पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी रयत सेवकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.



श्री. मंडले आणि सौ. मोहिते यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आल. इयत्ता दहावी ब चे वर्गशिक्षक इंग्रजी विषयप्रमुख सागर रंधवे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवण्यात आले. या कार्यक्रमासाठी तब्बल १४ विद्यार्थ्यांनी मनोगतपर भाषण केले. शितलकुमार म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. सूत्रसंचालन करून आभार सांस्कृतिक विभाग सहायक हर्षला पाटील यांनी मानले.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय येथे एक ऑगस्ट या दिवशी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

हा कार्यक्रम साजरा करण्याची संधी सांस्कृतिक विभागाने इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांकडे सोपविली होती. विद्यालयाचे चेअरमन शरद खारकर यांनी लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. जी. हजार व सर्व शिक्षकांनी



प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या वेळी आठवीच्या विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठे यांचा जीवनपट साकारणारी भाषणे सादर केली. आठवीचा विद्यार्थी सोहम वनमोरे याने लोकमान्य टिळकांबद्दल गाणे सादर केले. विद्यालयाचे चेअरमन शरद खारकर यांनी मनोगतात लोकमान्य टिळकांचे बालपणीचे किस्से आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना सांगितले तर अण्णाभाऊ साठे यांची सामाजिक बांधिलकी त्यांच्या भाषणातून विषद केली.

रयतच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी महापुरुषांच्या विचारांचे, आचाराचे, त्यांच्या कार्याचे अवलोकन करावे व त्यातून आपला योग्य मार्ग ठरवावा असे आपल्या भाषणातून बिंबवले.

या कार्यक्रम प्रसंगी आठवीच्या वर्गशिक्षिका व्ही. व्ही. गावंड, एस.डी. पाटील, पी. आर. पवार, सौ. कसपटे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभवी सोमासे या विद्यार्थिनीने अतिशय नियोजनबद्ध साकार केले.



**पनवेल : भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे पहिले नेते लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी के. सी. पाटील गुरुजी, अनिल कोळी, अशोक आंबेकर, निश्चल कोळी उपस्थित होते.** (छाया : संकेत भोईर)



**पनवेल :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालयात लोकमान्य, बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी झाली. या वेळी मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी टिळकांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले. कार्यक्रमाला मराठी प्राथमिक विभागाचे सर्व शिक्षक वृंद व इयत्ता चौथीचे विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन विद्यार्थिनी श्रेया जानकर हिने केले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले व कार्यक्रमाची सांगता झाली.



**पनवेल : साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्ताने महापालिकेच्या मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त अभिषेक पराडकर, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, लेखा अधिकारी संग्राम व्होरकाटे, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.**



**पनवेल : ज्येष्ठ नागरिक संघाच्या संचालक मंडळातर्फे लोकमान्य टिळकांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.**

## संपादकीय

# लोकमान्यतेची मोहोर

पुरस्कार किंवा सन्मानाच्या मंगल प्रसंगी राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवायचा असतो आणि व्यक्तिगत ऋणानुबंध अधिक दृढ करायचे असतात हे लोकशाहीचे तत्त्वच आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार या दोन्ही नेत्यांनी परस्परांतील सौहार्द न लपवता उघडपणे प्रदर्शित केले हे त्यांच्या राजकीय प्रगल्भतेचेच द्योतक आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एका शानदार समारंभात पुण्यनगरीमध्ये 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. तो क्षण महाराष्ट्राच्या इतिहासात अभिमानाने नोंदवला जाईल. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या १०३ व्या पुण्यतिथी निमित्ताने हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. पुरस्काराचे हे ४१वे वर्ष आहे. यापूर्वी माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी, इंदिरा गांधी, सरसंघचालक बाळासाहेब देवरस अशा अनेक दिग्गजांना टिळक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष दिपक टिळक यांच्या हस्ते पंतप्रधान मोदी यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला तेव्हा प्रमुख अतिथीच्या रूपाने राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार आणि माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आवर्जून उपस्थित होते. महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांची मांदियाळी स.प. महाविद्यालयाच्या पटांगणातील भव्य मंचावर उपस्थित होती. या पुरस्काराची एक लाख रुपयांची रक्कम तिथल्या तिथे पंतप्रधान मोदी यांनी नमामि गंगे उपक्रमासाठी दान करत असल्याचे जाहीर केले. या वेळी पुण्याशी असलेले आपले अनुबंध मोदींनी उलगडून दाखवले आणि स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये पुणेकरांचे योगदान अधोरेखित करताना लोकमान्य टिळक यांचे कार्य अजुनही पुढे नेले जात आहे याची उपस्थितांना जाणीव करून दिली. हा झाला पुरस्काराच्या वितरणाच्या तपशीलाचा भाग. पंतप्रधान मोदी यांच्यासाठी शरद पवार यांच्यासारखे कट्टर विरोधक नेते राजकीय मतभेद बाजूला ठेवून उपस्थित राहिले आणि त्यांच्याच पक्षाचे कार्यकर्ते पंतप्रधान मोदी यांच्या आगमनप्रसंगी काळे झेंडे फडकवण्याचा प्रयत्न करत होते हा विरोधाभास देखील यावेळी पहायला मिळाला. शरद पवार यांच्या उपस्थितीमुळे नव्याने स्थापन झालेल्या 'इंडिया' नावाच्या राष्ट्रीय कडबोळ्यातील घटक पक्षाचे नेते चक्रावून गेले, परंतु त्यांचा विरोध झुगारून देत पवार यांनी पंतप्रधान मोदी यांचे पुण्यामध्ये दिलखुलास स्वागत केले. इतकेच नव्हे तर भर मंचावर खळखळून हसत कौतुकाने त्यांची पाठदेखील थोपटली. हे लोभस दृश्य यावेळी बघायला मिळाले. लोकशाहीचे हेच तर खरे सौंदर्य आहे. प्रमुख पाहुणे या नात्याने पवार यांनी मोदी यांचे मन:पूर्वक अभिनंदन करताना लोकमान्यांच्या कार्याची आठवण जागवली. या संपूर्ण कार्यक्रमात कुठलीही राजकीय पडछाया त्यांनी पडू दिली नाही ही चांगली गोष्ट झाली. वास्तविक या कार्यक्रमावर महाराष्ट्रामध्ये तरी राजकारण शिजू लागले होते. पवार यांनी मोदी यांच्या कार्यक्रमाला उपस्थित राहू नये यासाठी महाविकास आघाडीतील काही नेत्यांनी जंगजंग पछाडले. उद्धव ठाकरे गटाच्या नेत्यांनी आणि प्रवक्त्यांनी पवार यांनी या कार्यक्रमाला जाणे आवडणारे नाही असे वारंवार सांगितले तर काँग्रेस पक्षाच्या काही नेत्यांनी कडक शब्दांत विरोध नोंदवला होता. 'इंडिया' या नव्या अवतारातील युपीएच्या राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांनीही उघडपणे नाके मुरडली होती. पवार यांच्यापासून फारकत घेऊन सरकारमध्ये सामील झालेले उपमुख्यमंत्री अजित पवार कार्यक्रमाच्या वेळी मंचावर उपस्थित होते. इतके प्रतिकूल वातावरण असूनही पवार यांनी मोदी यांचा कार्यक्रम चुकवला नाही. यामुळे आता राजकीय वर्तुळात भुवया उंचावल्या आहेत.**

# बँक ऑफ इंडियाची नवीन जागा अडचणीची

## वयोवृद्ध नागरिकांसह दिव्यांग व्यक्तींचे हाल

**खबरबात**
**महेश शिंदे**

वारंवार उद्भवणाऱ्या पूर परिस्थितीमुळे आणि सन २०२१च्या महापुरात मोठे नुकसान झाल्यानंतर बँक ऑफ इंडियाच्या महाड शाखेने सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला, मात्र नवीन घेण्यात आलेली जागादेखील अपूर्ण आणि पहिल्या मजल्यावर असल्याने वयोवृद्ध नागरिकांसह अन्य ग्राहकांनादेखील याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

महाड तालुका हा विस्ताराने आणि लोकसंख्येच्या दृष्टिकोनातूनदेखील मोठा आहे या ठिकाणी औद्योगिक वसाहत असल्याने बँकांचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर चालतात महाड शहरात बँक ऑफ इंडिया सह जवळपास दहाहून अधिक बँका आणि पतसंस्था कार्यरत आहेत. या सर्व बँका गेल्या अनेक वर्षापासून तळमजल्यावर कार्यरत होत्या मात्र सातत्याने येणारा पूर आणि २०२१ मध्ये आलेला महापौर यामध्ये बँकांचे मोठे नुकसान झाले होते. महाड शहरात येणाऱ्या पूर परिस्थितीमुळे बँकांनी पुरापासून सुरक्षित स्थळी स्थलांतर होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार बँक ऑफ इंडिया महाड शाखेने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून राष्ट्रीय स्मारक ते काकरतळे या रस्त्यावर असलेल्या नवीन इमारतीमध्ये बँक स्थलांतरित केली आहे, मात्र या ठिकाणी असलेली जागा अपुरी असून येणाऱ्या ग्राहकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.



बँक ऑफ इंडियाने जाहीर केलेल्या नवीन धोरणानुसार तालुकास्तरावर सोळाशे स्क्वेअर फुट जागा निश्चित केली आहे, मात्र महाड तालुक्याची व्याप्ती आणि लोकसंख्येचा विचार करता ही निश्चित केलेली जागा अपुरी आहे. यामुळे यावेळेस बँक स्थलांतर करण्याचा निर्णय आणि सर्वेक्षण झाले. त्यावेळेस तालुक्याच्या लोकसंख्येचा आणि ग्राहक संस्थेचा विचार होणे आवश्यक होते. ज्या ठिकाणी सध्या बँक ऑफ इंडियाची शाखा स्थलांतरित केलेली आहे. त्या इमारतीचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही त्यामुळे ग्राहकांना बँकेमध्ये येण्यासाठी अद्याप लिफ्टची सुविधा उपलब्ध झालेली नाही. बँकेमध्ये मोठ्या संख्येने ग्राहक जमा होत असल्याने उभे राहण्यासदेखील जागा मिळत नाही अशी स्थिती निर्माण झालेली आहे. बँक पहिल्या मजल्यावर असल्याने इमारत मालकाने बँकेत जाण्यासाठी बाहेरील बाजूने इमारत बांधकामामध्ये तडजोड करत लोखंडी जिना व उभा केला आहे. या जीन्यावरून आबाल वृद्धांना चालत जाणेदेखील शक्य होत नाही पावसामुळे या ठिकाणी सतत पाणी असल्याने जिन्यावरून घसरून अपघात होण्याचीदेखील शक्यता व्यक्त होत आहे. बँकेने ज्यावेळेस नवीन जागी स्थलांतर केले त्यावेळेस उपस्थित असलेल्या बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ग्राहकांशी संवाद साधला होता. त्यावेळेस बँकेत येण्याकरता लिफ्ट असणे गरजेचे आहे, असेदेखील म्हटले होते, मात्र अद्यापदेखील लिफ्टची सुविधा नसल्याने दिव्यांग व्यक्तींनादेखील पायऱ्या चढूनच जावे लागत आहे. याबाबत दिव्यांग संघटनांनीदेखील नाराजी व्यक्त केली आहे. बँकेमध्ये कर्मचारी संख्यादेखील अपूर्ण आहे. यामुळे येथील कर्मचाऱ्यांना कसरत करतच काम करावे लागत आहे.

बँकेच्या म्हणण्यानुसार बँकेच्या खालील भागात पासबुक प्रिंटिंग आणि एटीएम मशीन ठेवण्यात आलेले आहे. या मशीनचा ग्राहकांनी अधिकाधिक वापर केल्यास वरील गर्दी कमी होणार आहे शिवाय काही दिवसातच बँकेचा सेवा केंद्र हेदेखील सुरू होईल यामुळे ग्राहकांना होणारा त्रास कमी होईल.

# कवी, कादंबरीकार पुरुषोत्तम शिवराम रेगे

पुरुषोत्तम शिवराम रेगे उर्फ पु. शि. रेगे हे श्रेष्ठ मराठी कवी, तसेच कादंबरीकार नाटककार, समीक्षक व संपादक होते. त्यांचा आज जन्मदिन. रेगे यांचा जन्म २ ऑगस्ट १९१० रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मिठबाब येथे झाला. त्यांचे शिक्षण मुंबई व लंडन येथे बी.ए. व बी.एस्सीपर्यंत झाले. लंडनच्या स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून त्यांनी बी.एस्सी. पदवी मिळविली. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून विविध महाविद्यालयांतून त्यांनी काम केले. मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून ते निवृत्त झाले.

'सुहृद चंपा' आणि 'रूप कथ्थक' ही दोन टोपण नावे त्यांनी अनुक्रमे साधना आणि इतर कविता (१९३१) यातील कवितांसाठी तर 'रूपकथ्थक' हे टोपण नाव रंगपांचालिक आणि दोन नाटके (१९५८) या पुस्तकासाठी घेतली होती. त्यांचे अन्य साहित्य पु. शि. रेगे या नावानेच प्रसिद्ध झाले. काव्य संग्रहानंतर 'फुलोरा'(१९३७), 'हिमसेक'(१९४३), 'दोला'(१९५०), 'गंधरेखा'(१९५३), 'पुष्कळा'(१९६०), 'दुसरा पक्षी' (१९६६) आणि 'प्रियाळ'(१९७२) हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले.



सृजनशक्ती म्हणजेच स्त्रीशक्ती हा त्यांचा कवितेचा प्रधान विषय आहे. जीवनात विविध रूपाने वावरणारी सृजनशक्ती आणि विशेषतः तिचे स्त्रीदेहधारी स्वरूप हेच वेगवेगळ्या रूपांनी आणि स्त्रीप्रतिमांच्या साह्याने त्यांच्या कवितेत प्रकट होत असते आणि म्हणूनच त्यांच्या कवितेमागील प्रेरणा, तीमधील अनुभवविश्व, तिची प्रतिमासृष्टी, बंदिश आणि शब्दकळा ही स्वतंत्र व वेगळ्या जातीची आहेत. या सगळ्यांमध्ये त्यांचे आगळे काव्यात्म व्यक्तीमत्व आणि स्वत्व व्यक्त झाले आहे.

त्यांच्या कवितांची इंग्रजी, जर्मन, डॅनिश, स्पॅनिश व चिनी भाषांत भाषांतरे झाली आहेत. कारण त्यांत भारतीय परंपरेतून आलेली स्त्रीविषयक जाणीव आणि या जाणिवेवर झालेले आधुनिकतेचे संस्कार यांचा एक हृद्य मेळ आढळतो. 'सावित्री'(१९६२), 'अवलोकिता'(१९६४), 'रेणू'(१९७३) आणि 'मातृका'(१९७८) या रेगे यांच्या चारी कादंबऱ्या काव्यात्म व अर्थगर्भ आहेत. अशा या श्रेष्ठ कवीचे १७ फेब्रुवारी १९७८ रोजी निधन झाले.

रेगे यांनी छंदमध्ये विपुल लेखन तर केलेच पण त्याची संपादकीय व्यावहारिक व आर्थिक बाजूही आस्थेने संभाळली.

**(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

# मित्र-मैत्रिणीला गिफ्ट करू शकता 'ही' मस्त गॅजेट्स



मैत्री हे एक सुंदर नातं आहे. मैत्रीचे क्षण संस्मरणीय बनवण्यासाठी दरवर्षी मैत्री दिन साजरा केला जातो. भारतात यंदा ६ ऑगस्ट रोजी फ्रेंडशिप डे साजरा केला जाणार आहे. जर का तुमच्या मित्राला गॅजेट्स वापरण्याची आवड असेल तर तुम्ही काही तुमच्या बजेटमधील चांगली गॅजेट्स त्यांना भेट देऊ शकता.

**कस्टम फोन केस**

कस्टम फोन केस हे गिफ्ट देण्यासाठी एक चांगला पर्याय आहे. विशेषतः बालपणीच्या मित्रासाठी. यावर तुम्ही तुमच्या मित्राचा किंवा त्याच्या लहानपणीच्या आवडत्या कार्टूनचा फोटो प्रिंट करून भेट देऊ शकता.

**स्मार्ट सनग्लासेस**

जर का तुमच्या एखाद्या मित्राला टेक्नॉलॉजीची आवड असेल तर तुम्ही त्याला स्मार्ट सनग्लासेसची एक जोडीदेखील मैत्री दिनाबद्दल भेट देऊ शकता. तुम्ही तुमच्ये बजेटनुसार ते खरेदी करून मित्राला भेट देऊ शकता.

**शॉवर ब्लूटूथ स्पीकर**

जर का तुमच्या मित्राला अंघोळ करता करता गाणी ऐकण्याची सवय असेल, तर तुम्ही त्याला शॉवर ब्लूटूथ स्पिकरदेखील भेट देऊ शकता. शॉवर ब्लूटूथ स्पीकर हा आयपी रेटिंगसह येतो.

**स्मार्ट ब्लूटूथ ट्रॅकर**

आपला एखादा मित्र असा असतोच की त्याला आपल्या वस्तू विसरायची सवय असते. तुम्ही त्याला स्मार्ट ब्लूटूथ ट्रॅकर भेट देऊ शकता. हे किचेनशी जोडता येते. फोनसह कॉन्फिगर केल्यावर, वापरकर्ते ट्रॅकरपासून दूर जाताच त्यांना एक अलार्म प्राप्त होईल. या ट्रॅकरमुळे तुमच्या मित्राला चाव्या आणि पाकीट नेहमी जवळ ठेवण्यासाठी मदत करेल.

**किंडल ई-बुक रीडर**

तुमचा एखादा मित्र असा असतो ज्याला भरपूर फिरायला आवडत असते. तो नेहमीच फिरत असतो. तर त्यांना तुम्ही ईबुक रीडर भेट देऊ शकता. ठराविक टॅबलेटशी याची तुलना केल्यास ई-बुक रीडरची बॅटरी जास्त काळ टिकते.

# भारतीय तिरंग्याचे रचनाकार पिंगाली वेंकय्या

भारतीय राष्ट्रध्वजाचे म्हणजेच तिरंग्याचे आद्य रचनाकार पिंगली वेंकैया यांची आज जयंती आहे. सध्याच्या आंध्रप्रदेश राज्यात असणाऱ्या मच्छलीपट्टम येथील भतलामपेनूमारू येथे २ ऑगस्ट १८७६ रोजी त्यांचा जन्म झाला होता.

भारतात प्रत्येक जाती-धर्माच्या रूढी, परंपरा आणि संस्कृती एकमेकांपेक्षा कितीही भिन्न असल्या तरीही वर्षातून असे दोन दिवस येतात जेव्हा सर्वधर्मीय एकाच जल्लोषात, आदराने आपली जात, आपला धर्म विसरून एकत्र येतात. एक दिवस आहे २६ जानेवारी अर्थात प्रजासत्ताक दिन आणि दुसरा १५ ऑगस्ट म्हणजेच स्वातंत्र्य दिवस.

या दोनही दिवशी लहान मोठ्यांच्या छातीवर भारताच्या तिरंग्याचे छोटे प्रतीक झळकत असते. झेंडावंदनाच्या कार्यक्रमाला आपल्या तिरंग्याखाली आपण 'भारतीय' म्हणून गर्वाने उभे राहतो. बाकी दिवशी आपण भारतीय आहोत याचा विसर आपल्याला पडत असला तरी आपला तिरंगा मात्र आपल्याला याची जाणीव करून देतो.

तिरंगी ध्वजाचे रचना करणारे वेंकय्या हे भूशास्त्र, शेती या विषयात उच्चशिक्षित तसेच ते शिक्षणतज्ञ होते. मछलीपट्टणम येथे त्यांनी स्वतःची शैक्षणिक संस्था स्थापन केली होती.



**निमित्त**

गावातूनच प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी पुढील उच्चशिक्षणासाठी कोलंबो गाठले. त्यांनी जर्मनी आणि उर्दू भाषांचादेखील खूप अभ्यास केला. वयाच्या १९ व्या वर्षी त्यांनी ब्रिटिश भारतीय सेनेत प्रवेश केला आणि आफ्रिकेत युद्धात सुद्धा सामील झाले. भारतात त्यांनी काही काळ रेल्वे मध्ये सुद्धा काम केले होते.

आफ्रिकेत असतानाच त्यांची भेट झाली मोहनदास करमचंद गांधी यांच्याशी. गांधींजींसोबत ते भारतात आले आणि स्वातंत्र्यचळवळीत स्वतःला झोकून दिले.

आज आपण जो तिरंगा पहातो तो काही एका प्रयत्नात तयार झाला नाही. आपल्या तिरंग्यालाही रंजक इतिहास आहे. ब्रिटिशांनी १८५७मध्ये एक राष्ट्र एक ध्वज असावा म्हणून भारतामध्ये त्यांनी रचना केलेला ध्वज फडकविला. या लाल ध्वजावर ब्रिटिशांच्या 'युनियन जॅक'चेसुद्धा छोटे स्वरूप होते. यानंतर अनेक वेळा, अनेक ठिकाणी, वेगवेगळ्या व्यक्ती व संघटनांनी विविध प्रकारचे ध्वज फडकावले.

भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या काही दिवस आधी म्हणजे २३ जून १९४७ रोजी एक समिती स्थापन झाली. या समितीमार्फत भारतही राष्ट्रीय ध्वज कसा असेल हे ठरविले गेले. या समितीने एकमताने असे ठरविले की, १९३१मध्ये पिंगाली वेंकय्या यांनी रचना केलेला ध्वज हाच योग्य असून यामध्ये थोडे बदल केले जावेत. त्यानुसार राष्ट्रध्वजाचा आकार, लांबी, रुंदी, कापड इत्यादी बाबी ठरविल्या गेल्या. १९३१मध्ये असलेल्या रचनेप्रमाणेच रंग ठेऊन फक्त चरखा काढून त्याजागी अशोकचक्र असावे असे ठरले. यानुसार ध्वजामध्ये सर्वात वरील पट्टी भगव्या रंगाची ही क्रांतिकारकांच्या बलिदानाचे प्रतीक, मधली पट्टी पांढऱ्या रंगाची भारतातील शांततेचे प्रतीक, तिसरी पट्टी हिरव्या रंगाची भारतातील समृद्धतेचे प्रतीक आणि या सगळ्यांमध्ये २४ आरे असलेले अशोकचक्र प्रगतीकडे वाटचाल अशा अर्थाने आपला तिरंगा तयार झाला.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**रत्नागिरी : जिह्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र मार्लेश्वर येथील सह्याद्रीच्या उंचच उंच डोंगररांगांतून कोसळणारे फेसळणारे धबधबे पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहेत.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

# दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारांपासून करा बचाव!



आयुर्वेदानुसार पावसाळ्यात पाण्यामध्ये एक दोष निर्माण होतो, तो म्हणजे पिच्छिलता अर्थात बुळबुळीतपणा. वर्षा ऋतूमध्ये पावसाच्या पाण्याचा मातीशी संबंध आल्यानंतर त्यामध्ये पिच्छिलता म्हणजे बुळबुळीतपणाचा दोष निर्माण होतो, असे चरकसंहितेचे भाष्यकार चक्रपाणी सांगतात. हा दोष शरद ऋतूमध्ये नष्ट होतो.

पावसाळ्यानंतर काही दिवस उलटून गेल्यामुळे काळाच्या परिणामाने शरदातले पाणी पक्क होते म्हणजेच दोषरहित व शरीरामध्ये दोष न वाढवणारे असे बनते, मात्र पावसाळ्यातील पाण्यामध्ये बुळबुळीतपणाचा दोष असतो. चरकसंहितेने या ऋतूमध्ये बरसणारे पाणी निश्चित दोषकारक सांगितले आहे. मथितार्थ हाच की पावसाळ्यामध्ये स्वास्थ्य बिघडते त्याचे एक कारण म्हणजे पाणी.

चरकसंहितेनुसार पाणी प्रदूषित का होते व प्रदूषित पाणी कसे ओळखावे याचे आयुर्वेदाने इसवी सनाच्या एक हजार वर्षे इतक्या प्राचीन काळामध्ये केलेले मार्गदर्शन आजही उपयोगी पडण्यासारखे असल्याने आजसुद्धा आपल्याला मार्गदर्शक आहे.

डेंग्यू, मलेरिया हे अप्रत्यक्षरित्या पाण्याशी संबंधित आहेत, कारण पाण्यावर डासांची पैदास होते, जे डास या आजारांच्या संसर्गास व फैलावास कारणीभूत होऊ शकतात. पचनसंस्थेशी संबंधित इतर आजार हे थेट दूषित पाण्याशी संबंधित आहेत. साहजिकच हे संसर्गजन्य रोग टाळण्याचा सोपा उपाय म्हणजे दूषित पाण्यापासून स्वतःला दूर ठेवणे आणि पाणी उकळवून पिणे. प्रदेश कोणताही असो, पावसाळ्याच्या या दिवसांत पाण्याला उकळी येईपर्यंत उकळवावे आणि गाळूनच प्यावे. मलेरिया, डेंगू यासारख्या आजारांना प्रतिबंध करायचा उपाय म्हणजे डासांची पैदास होणार नाही याची काळजी घेणे, जे कठीण असले तरी अशक्य नाही. प्रशासन, नगरपालिका, कर्मचारी आणि नागरिक यांच्या सहकार्याने डासांचे आणि पर्यायाने मलेरिया, डेंगू या रोगांचे निर्मूलन शक्य आहे.

# नवी मुंबईत ठिगळ लावलेले रस्ते

## खड्डे बुजतायेत, मात्र पसरलेली रेती धोकादायक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेतर्फे शहरात ठिकठिकाणी खड्डे बुजवण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. अनेक मार्गांवर डांबरीकरण करण्यात येत असले तरी आद्यपही शहरांतर्गत अनेक मार्ग हे ओबडधोबड दिसून येत आहेत. खड्डे पडल्यानंतर त्यावर मारलेल्या पॅचमुळे पुन्हा प्रवास करताना खड्डेमय अनुभव नवी मुंबईकरांना येत आहे.

मुख्यालयासमोर तयार करण्यात आलेले एकसंध व गुळगुळीत रस्त्यांवरून सुखद आनंद देणाऱ्या प्रवासाची वाट नवी मुंबईकर पाहत आहेत. एकीकडे ही स्थिती असताना नागरिकांचे हाल काही कमी होत नाहीयेत. पावसाने उसंत घेतल्यावर खड्डे बुजवण्याला वेग आला असला तरी रस्त्यावर पसरलेली रेती जीवघेणी ठरत आहे.

शहरात सध्या स्वच्छ सर्वेक्षणाच्या कामांनी वेग धरलेला आहे. त्यासाठी संपूर्ण शहर नव्या रंगात रंगवले गेले आहे. विद्यमान आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या दूरदृष्टीमुळे शहरात स्वच्छतेला उभारी मिळत आहे. एकाबाजूला स्वच्छ सर्वेक्षणावर कोट्यवधी रुपये खर्च केले जात असताना असताना नागरिकांच्या मूलभूत सुविधांमध्ये मोडल्या जाणाऱ्या रस्त्यांबाबत मात्र पालिकेची उदासीनता दिसून येत आहे. पावसाळ्यातील खड्डे बुजवून रस्ते खड्डेमुक्त केले जात असले तरी त्यावर मारलेले वेडे वाकडे ओबडधोबड पॅच खड्ड्यांचाच अनुभव देत आहेत. त्यामुळे नवी मुंबईतील रस्ते ठिगळ मुक्त व गुळगुळीत कधी होणार? असा प्रश्न विचारला जात आहे.

रस्ते बनवताना कंत्राटदार, पालिका अधिकारी व राजकारण्यांच्या नैसर्गिक युतीशिवाय कामे केली जात नसल्याचे नागरिक देखील उघड उघड बोलू लागले आहेत. सातत्याने त्या रस्त्यांवर खड्डे पडून नवीन कंत्राटे निघावीत व आपले उखळ पांढरे करण्यासठी राजकारणी, अधिकारी व कंत्राटदारांच्या संगनमताने हे रस्ते दुय्यम दर्जाचे बनवले जात आहेत. या अभद्र युतीचा फटका नवी मुंबई शहरातील नागरिकांना बसू लागला आहे. सपाट व खड्डे विरहित रस्तेसेवा ही नागरिकांची मूलभूत गरज असताना त्याकडे अर्थकारण म्हणून पाहिले जात आहे. शहराला आधुनिक स्वरूप प्राप्त करून देणारे अंतर्गत रस्तेच भ्रष्टाचाराचे कुरण ठरू लागले आहेत. एकदा डांबरीकरण केले की प्रत्येक पावसाळ्यात हे डांबर व निकृष्ट गतिरोधक कसे काय वाहून जातात हे ना सुटणारे कोडे आहे. त्यामुळे नागरिकांकडूनदेखील उघड उघड आरोप पालिकेवर होऊ लागले आहेत. विद्यमान आयुक्त नार्वेकर यांच्याकडून नागरिकांना मोठ्या अपेक्षा आहेत. अनेकदा रस्त्यावर डांबरीकरण केल्यावर अनेकदा घरगुती गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी, मलनि:स्सारण वाहिन्या टाकण्यासाठी खोदकाम केले जाते. त्यामुळे नव्याने केलेल्या डांबरीकरणाचा व गुळगुळीत रस्त्यांचा काही दिवसंपूरताच आनंद नागरिकांना घ्यावा लागत आहे. त्यावर वेडे वाकडे पॅच मारून बुजवले जात आहेत. अनेक बाबींमध्ये महाराष्ट्राच्या मागे असलेले गुजरात त्यांच्या रस्त्यांच्या गुणवत्तेवरून देशात नावाजले गेलेले आहे, मात्र नवी मुंबई सारख्या आधुनिक शहरात रस्त्यांसारखी मूलभूत सेवा दर्जेदार करता आलेली नाही. दुय्यम दर्जाचे मटेरियल वापरून शहरातील रस्ते तयार केले जात असल्याने काही महिन्यांतच या रस्त्यांचे पितळ उघडे पडत आहेत. या रस्त्यांवर काही महिन्यांतच खड्डे पडत असल्याने नागरिक मात्र चांगलेच संतापत आहेत. येणाऱ्या प्रत्येक पावसाळ्यात निकृष्ट दर्जाचे रस्ते उघडे पाडत आहे. निकृष्ट डांबरीकरण त्यातून पुन्हा पडणारे खड्डे त्यासाठी पुन्हा काढण्यात येणारे कामाचे कंत्राट व त्यातून होणारा भ्रष्टाचार हे चक्र कधी थांबणार, अशी विचारणा होऊ लागली आहे.

दरम्यान, आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यासमोर गुणवत्तापूर्ण रस्ते उभारण्याचे मोठे आव्हान आहे. सध्या प्रशासक म्हणून कारभार सांभाळणाऱ्या आयुक्तांना शहराला चांगली सुविधा मिळवून देण्याची उत्तम संधी आहे.

### मुख्यालय आवारात गुळगुळीत रस्ते

एकीकडे शहरात रस्त्यांवर खड्डे पडत असतानाच, नवी मुंबई पालिका मुख्यालयाच्या अवरभोवतीचा रस्ता मात्र कित्येक वर्ष गुळगुळीत खड्डे विरहित आहे. पालिका मुख्यालयातदेखील सातत्याने वाहनांची वर्दळ असते. तरीही हा मार्ग खड्डे विरहित असताना शहरातील कर भरणाऱ्या नागरिकांना पालिका असे रस्ते का पुरवत नाही, असा प्रश्न विचारला जात आहे.





**नवी मुंबई : थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्या वतीने मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. या वेळी शहर अभियंता संजय देसाई, माजी महापौर सुधाकर सोनवणे, प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात, संजीव पवार, अरविंद उरसळ, उपअभियंता जयंत कांबळे आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.**

## उरण महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम



**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केले गेले.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांनी अण्णाभाऊचे साहित्य हे जगभरातील लोकांसाठी प्रेरणादायी ठरले असे प्रतिपादन केले. तर डॉ. एम.जी लोणे यांनी लोकमान्य टिळक यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

या वेळी ज्येष्ठ प्राध्यापक के. ए. शामा, आयक्यूएसी समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण, ऑफिस सुप्रीटेंडंट तानाजी घ्यार, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दत्ता हिंगमिरे तर आभार प्रा. ए. के. गायकवाड यांनी मानले.

## सीकेटी विद्यालयात लोकमान्य टिळक, लोकशाहीर आणणाभाऊ साठे यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक विद्यालयाच्या मराठी माध्यमिक विभागामध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अणणाभाऊ साठे जयंती कार्यक्रम झाला.





महान समाजसुधारक व स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व साहित्यरत्न लोकशाहीर आणणाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुजन तसेच प्रतिमेस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थित मान्यवरांचे स्वागत विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीत व ईशस्तवनातून केले. कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे व पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांचे मार्गदर्शन लाभले.

सांस्कृतिक समितीने राबविलेल्या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी थोर नेते लोकमान्य टिळक व लोकशाहीर आणणाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याबद्दल भाषण, लोकमान्य टिळकांच्या वेशभूषेतील स्वगत सादर केले तसेच लोकमान्य टिळकांच्या जीवनपटावरील प्रेरणागीत सादर केले. कार्यक्रमासाठी लाभलेल्या प्रमुख पाहुण्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी)च्या समतादूत रागिणी साखरकर यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी उच्च माध्यमिक विद्यालायचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी माध्यम प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, निलिमा शिंदे मॅडम, वैशाली पारधी अन्य विभाग प्रमुख कार्यक्रमास उपस्थित होते.

## महिलांसाठी मोफत आरोग्य चिकित्सा शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

उत्कर्ष ज्येष्ठ महिला मंडळ नेरूळ यांच्या विद्यमाने नेरूळ येथील मदर तेरेसा गार्डनमधील विरंगुळा केंद्रात सोमवारी (दि. ३१) मोफत आरोग्य चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले. डॉ. गिरीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या चिकित्सा शिबिरात प्रामुख्याने थायरॉईड, लिपीड प्रोफाइल, शुगर टेस्ट या प्राथमिक आरोग्य रक्तचाचण्या करण्यात आल्या. सुमारे ५० महिलांनी या शिबिराचा लाभ घेतला.

उत्कर्ष महिला मंडळाच्या अध्यक्षा स्वाती फडके, सचिव स्मिता माढेकर आणि उपाध्यक्षा प्रतिभा कुलकर्णी यांच्या पुढाकाराने आयोजित या शिबिरात रामकृष्ण नेत्रालयचे प्रतिनिधी रणजीत दीक्षित व त्यांचे सहकारी तसेच अजय माढेकर, प्रभाकरराव गुमास्ते आणि सहकारी यांचाही चांगला सहयोग लाभला.

डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी उपस्थितांशी संवाद साधताना महिलांमधील होणाऱ्या विविध आजारावर सखोल मार्गदर्शन करुन महिलांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे अगदी समर्पक शब्दात समजावून दिली. कोणताही आजार वरील टेस्टद्वारे अगोदरच कळला तर त्याला रोखण्यात लवकरात लवकर उपाययोजना करणे अधिक सुलभ व शक्य होईल, म्हणून सर्वांनी या बेसिक चाचण्या काही महिन्यांच्या अंतराने करत राहणे शरीर स्वास्थ्याच्या दृष्टीने आवश्यक आहे असे त्यांनी सुचित केले. येणाऱ्या पुढील काळात देखील असे विविध प्रकारचे शारीरिक दृष्ट्या महत्त्वाची आरोग्य चिकित्सा शिबिरे सर्वांसाठी उपलब्ध करुन देण्यात येतील असे स्वाती फडके यांनी सांगितले.

रामकृष्ण नेत्रालयाचे विपणन सल्लागार रणजीत दीक्षित यांनी नेत्रालयाबद्दलची चालू उपक्रमांची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. या आरोग्य चिकित्सा शिबिरासाठी आलेल्या प्रतिनिधींनी चिकित्सा करण्यासाठी आलेल्या महिलांची अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने तपासणी केली. उत्कर्ष महिला मंडळाच्या सर्व भगिनींच्या प्रयत्नाने हे शिबिर यशस्वी झाले.




## निवडक

### पनवेलमध्ये सर्पदंशाने तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** तालुक्यातील चिंध्रण गावामध्ये रविवारी सायंकाळी साडेसहा वाजता २१ वर्षीय तरुणाला नागाने दंश केल्याने त्याचा मृत्यू झाला. अनिकेत कदम असे या तरुणाचे नाव आहे. रात्री उशीरा अनिकेतची प्रकृती चिंताजनक झाल्याने त्याला पनवेल शहरातील नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र मध्यरात्री त्याचा मृत्यू झाल्याचे त्याच्या नातेवाईकांनी सांगितले. सोमवारी सकाळी अनिकेतच्या पार्थिवावर चिंध्रण गावातील स्मशानभूमीत अंतिमसंस्कार करण्यात आले.

### करंजाडेतून तरुणी बेपत्ता



**पनवेल :** करंजाडे वसाहतीमध्ये राहणारी एक १९ वर्षीय तरुणी कोणास काही एक न सांगता कोठेतरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. रेणुका विजय काळे असे या तरुणीचे नाव असून तिची उंची पाच फुट, बांधा मध्यम, केस काळे, रंग गोरा, नाक सरळ, डोळे बारीक काळे, गळ्या मध्ये सोन्याचा पत्ता, उजव्या हातावरती तिचे स्वताचे नाव गोंदलेले असे तिचे वर्णन असून तिने अंगात मेहंदी रंगाचा पंजाबी ड्रेस घातलेला आहे. तिला मराठी व हिंदी भाषा बोलते येते. सदर तरुणीबाबत कोणास काही माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३) किंवा पोलीस हवालदार एस.जी.जवरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ट्रेलरच्या धडकेत रिक्षाचालक जखमी

**पनवेल :** भरधाव ट्रेलरचालकाची रिक्षाला बसलेल्या धडकेत रिक्षाचालक गंभीर जखमी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील कसळखंड गावाच्या बसस्टॉपवर घडली आहे. याप्रकरणी ट्रेलरचालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ट्रेलरचालक राजेंद्रप्रसाद त्याच्या ताब्यातील ट्रेलरची (एमएच ०६ एक्यू ७६८७) आप्टे लॉजिस्टिक कंपनीच्या समोर रस्त्यावर, कसळखंड बस स्टॉपजवळ पुढे जात असलेल्या रिक्षाला (एमएच ४८ वीडी ७६८७) धडक बसली. या धडकेत रिक्षाचालक रोहित माळी ह्याच्या डोके, पोट व पायावर गंभीर दुखापत झाली. याप्रकरणी ट्रेलरचालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात असून अधिक चौकशी सहाय्यक पोलीस निरीक्षक मिलिंद फडतरे करीत आहेत.

### अल्पवयीन तरुणाचे अपहरण

**पनवेल :** तालुक्यातील विठ्ठलवाडी येथे राहणाऱ्या एका अल्पवयीन तरुणास अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अल्पवयीन मुलाला त्याच्या आईने तु मोबाईल का बघतोस असे बोलण्याचा त्यास राग येवुन तो त्याच्या घरातुन बाहेर गेला असता कोणीतरी अज्ञात व्यक्तीने त्याला फुस लावून पळवून नेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेट्टे करीत आहेत.

### ८ ऑगस्ट रोजी पेन्शन अदालत

**नवी मुंबई :** कोकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत ८ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ११ वाजता कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे. असे प्र. तहसीलदार, (सामान्य प्रशासन) कोकण विभाग यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

### वाशी येथे आरोग्य तपासणी शिबिर

**नवी मुंबई :** भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष माजी आमदार संदीप नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात गुरुवारी ३ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते ५ दरम्यान वाशी सेक्टर १५ येथील माधव सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये करण्यात आले आहे, असे माजी नगरसेवक प्रकाश मोरे आणि शिल्पा मोरे यांनी सांगितले.

## सूरताल विद्यालयाचा गुरुपौर्णिमा उत्सव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वरनादब्रह्म शैक्षणिक व सांस्कृतिक कला मंडळ संचालित सूरताल विद्यालयाचा गुरुपौर्णिमा महोत्सव खांदा कॉलनीतील जनसेवा आश्रम हॉल येथे झाला. या कार्यक्रमाला भाजप महिला मोर्चा माजी अध्यक्षा राजश्री भिमराव पोवार व ज्येष्ठ गायिका सूरश्री श्रीखंडे यांच्यासह आजी-माजी विद्यार्थी व पालकवर्गाची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तबला गुरु विष्णू पांचाळ यांनी सरस्वतीचे व गुरुवर्य पं. शांताराम चिगरी गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय गायन तसेच संवादिनी व तबला वादनाचा कार्यक्रम संपन्न झाला. उपस्थित पालकांनी या कलाकारांना टाळ्यांच्या कडकडाटात प्रोत्साहन दिले. योगिनी वैदू, विशाखा नागोठणेकर, प्राजक्ता जाधव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. नीळकंठ धुरे यांनी आभारप्रदर्शन केले. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने सर्व विद्यार्थी एकत्र येवून या कार्यक्रमाचे नियोजन करतात. आपल्या पालकांसमोर आपल्या कलेचे सादरीकरण करण्याचा आगळावेगळा आनंदही या विद्यार्थ्यांना मिळतो, असे सूरताल संगीत विद्यालयाच्या संचालिका ज्योती पांचाळ यांनी सांगितले.

## नेरूळमध्ये मोफत आरोग्य शिबिर

**नवी मुंबई :** शिव वाहतूक सेना यांच्या वतीने अपोलो रुग्णालयाच्या सहकार्याने रिक्षा चालकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, नेरूळ सेक्टर २८ येथे शुक्रवारी (दि. ४) सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आले असल्याचे अध्यक्ष दिलीप आमले यांनी कळविले आहे. या वेळी ब्लडशुगर, रक्त दाब, मधुमेह, मलेरिया, हाडांची आणि डोळ्यांची तपासणी करण्यात येणार असून नवी मुंबईतील रिक्षाचालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## २१ वर्षांनंतर मैत्रीदिनी पुन्हा शाळा भरली



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळेच्या इयत्ता सातवीच्या सन २००२ सालच्या बॅचचे सर्व माजी विद्यार्थी आणि माझी वर्ग शिक्षक पांडुरंग भोपी गुरुजी यांची मैत्री दिनाच्या दिवशी तब्बल २१ वर्षानंतर पुन्हा एकत्र येऊन माजी विद्यार्थ्यांनी भेट घेतली.

या वेळी प्रत्येकाने आपापल्या जीवनातील गोष्टी सांगितल्या. सर्व विद्यार्थी वर्गाचे गुरुजींना भेटून मन भरून आले होते. तसेच ज्या गुरुजींना शालेय जीवनात घाबरणारे विद्यार्थी म्हणून ओळखले जायचे त्यांच्याशी अगदी मन भरून गप्पा मारत होते. या वेळी पुन्हा एकदा ही शाळा भरावी अस सगळ्यांना वाटत होत. भेटीदरम्यान गुरुजींना शाल आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तर गुरुजींनी सगळ्या विद्यार्थ्यांना भेट वस्तू दिल्या. गुरुजींची आठवण सदैव आपल्यासोबत असावी म्हणून , विद्यार्थ्यांनी एक नवीन शक्कल लढवली. एकवीस वर्षांपूर्वी ज्या पट्टीचा छडी धाक असायचा त्याच पट्टीवर गुरुजींची स्वाक्षरी घेऊन आठवण कायम राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी पट्टी आपापल्या घरी घेऊन गेले.

हा सोहळा खऱ्या अर्थाने गुरुजी आणि शिष्य या दोघांच्या ही आयुष्यात कायम स्मरणात राहणारा होता. या वेळी माजी विद्यार्थी राकेश वाडेकर, वैभव मढवी, प्रशांत परदेशी, जगदीश डावलेकर, अमोल निर्गुण, संदेश देसाई, मच्छिंद्र सुतार, रमेश ग्रिसवला, संकेत मांगरुळकर, महेंद्र केणी, भारती मढवी, अश्विनी परदेशी, सना शेख, राजश्री शिंदे, मोहिनी भोसले, रेश्मा परदेशी, ऋतिका परदेशी, स्वप्नाली शिंदे, अखिल जोगदंड, विशाल जोगदंड, आदीती पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी विद्यार्थी राकेश वाडेकर आणि वैभव मढवी यांनी अथक परिश्रम घेतले.

# रोहा तालुक्यातील दरडप्रवण ग्रामस्थांची बैठक

## संरक्षक भिंत, स्थलांतर, तात्पुरता निवारा यावर चर्चा

**रोहे : प्रतिनिधी**

खालापुरातील इर्शाळवाडीवर दरड कोसळून मोठी घटना घडली. याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून रोहा तालुक्यातील प्रशासन अलर्ट मोडवर असून तालुक्यातील दरडप्रवण असलेल्या १६ गावांवर विशेष लक्ष आहे. या पार्श्वभूमीवर आमदार अनिकेत तटकरे यांनी रोहा तहसील कार्यालयात तिसे, वाळुंजवाडी, मेढा आदी गावातील ग्रामस्थांची बैठक घेतली. या बैठकीत संरक्षक भिंत, स्थलांतर, तात्पुरता निवारा व अन्य पर्यायी व्यवस्था याबाबत चर्चा करण्यात आली.



या बैठकीस दरडप्रवण गावांतील ग्रामस्थांसह प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, तहसीलदार किशोर देशमुख, गटविकास अधिकारी बाळासाहेब भोगे, सहाय्यक गटविकास अधिकारी महारुद्र फडतरे,यासह दरड प्रवण गावांतील सरपंच, उपसरपंच, लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ, विविध विभागांतील अधिकारी उपस्थित होते.

शासनाकडून दरडप्रवण तिसे गावात संरक्षक भिंत बांधण्याचे सूचविण्यात आले होते. यांसह या गावातील नागरिकांना स्थलांतरीत करण्यासाठी गावानजिक सरकारी जागा नसल्याने खाजगी जागा संपादन करण्याचे या वेळी सूचविण्यात आले. तात्पुरता निवारा शेड उभारणे यांसह अन्य पर्यायी व्यवस्थांबाबत चर्चा करण्यात आली. दरड पडण्याच्या ठिकाणी डोंगर भागात माती काढून टप्पे करण्याची सूचनाही पुढे आली.

वाळूंजवाडी या ठिकाणी ही संरक्षण भिंत हा पर्याय असला तरीही भिंत दरडीसमोर टिकू शकत नाही, असे ग्रामस्थांनी सांगितले. गावाजवळ सरकारी जागा नाही. काही अंतरावर सरकारी जागा असल्याने ग्रामस्थांना असुविधा होणार आहे. त्यामुळे खासगी जागा गावानजिक संपादित करून स्थलांतराबाबत चर्चा करण्यात आली. पावसाळ्यात निवाराशेड उभारूनही पर्यायी व्यवस्था होऊ शकते, याबाबत काही सूचना करण्यात आल्या.

मेढा नाक्याशेजारी सरकारी पर्यायी जागा असल्याने या ठिकाणी स्थलांतरित करण्याची सूचना ग्रामस्थांनी मांडली. यांसह पद्मावती नगर, शहरातील विषय हाताळण्यात आले.

पावसाळ्यात नागरिकांनी आपली काळजी घेत सुरक्षित ठिकाणी राहाण्याचे आवाहन आमदार अनिकेत तटकरे यांनी करीत ग्रामस्थांच्या सूचना सरकारपर्यंत पोहचविणारे असल्याचे सांगितले.

प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल व तहसीलदार किशोर देशमुख यांनी दरडप्रवण गावात तलाठी, ग्रामसेवक जात तेथील माहिती संकलित करीत असल्याचे सांगून शासन या गावावर लक्ष ठेवीन आहे. यासाठी पर्यायी व्यवस्था करण्यासाठी अहवाल तयार करून शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे सांगितले.

# चेक बाऊन्सप्रकरणी महिलेस एक वर्ष सक्षम कारावास

## १० लाख रुपये नुकसान भरपाईचा आदेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

येथील जनसेवा नगरी सहकारी पतसंस्थेला दिलेला पाच लाख रुपयांचा चेक बाऊन्स झाल्यामुळे मुख्य न्याय दंडाधिकारी एस. डब्ल्यू. उगले यांनी एक महिलेला एक वर्षाच्या सक्षम कारावासाची शिक्षा सुनावली, तसेच १० लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले. जनसेवा नगरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. जे. टी. पाटील यांनी ही माहिती दिली.

जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबागच्या कर्जदार मूळच्या महाड येथील रहिवाशी वैशाली संदीप जाधव हिने घेतलेल्या कर्जफेडीकरीता पाच लाखांचा चेक पतसंस्थेस दिला होता. हा चेक पतसंस्थेने त्यांच्या बँक खात्यात भरणा केला असता तो न वटता परत आला त्यांनतर पतसंस्थेने वैशाली जाधव हिस नोटीस देऊन चेकच्या रकमेची मागणी केली, मात्र वैशाली जाधव हिने चेकची रक्कम संस्थेस भरणा केली नाही किंवा नोटिसीला उत्तरही दिले नाही. त्यानंतर पतसंस्थेने अलिबाग येथील मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्टच्या कलम १३८प्रमाणे खटला दाखल केला होता.

हा खटला अंतिमरित्या चालविण्याकरिता मुख्य न्यायदंडाधिकारी एस. डब्ल्यू. उगले यांच्याकडे आला. त्यांनी २५ जुलै २०२३ रोजी निकाल दिला. वैशाली जाधव हिस एक वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली व पतसंस्थेस १० लाख रुपये नुकसानभरपाई देण्याची शिक्षा ठोठावली.

कर्ज प्रकरणात सिक्युरिटी म्हणून दिलेला चेकसुद्धा बँकेत भरणा करता येतो व असा चेक न वटता परत आल्यास चेक देणाऱ्याविरुद्ध कलम १३८प्रमाणे खटला चालू शकतो, असा महत्त्वपूर्ण निष्कर्ष या केसमध्ये निकाल देताना न्यायाधीश एस. डब्ल्यू. उगले यांनी काढलेला आहे. जनसेवा पतसंस्थेच्या वतीने ॲड. स्वाती कुलकर्णी, ॲड. अतुल उल्हास तुरकर व ॲड. आदित्य विजय सावंत यांनी काम पाहिले, अशी माहिती जनसेवा नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. जे. टी. पाटील यांनी दिली.

# आडोशी मार्गावर चिंचवली पुलावर खड्डे

## लघु उद्योग नगरीची वाट बिकट

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील लघु औद्योगिक विभाग असलेल्या साजगाव-आडोशी मार्गावर चिंचवली गोहे येथील पुलावर पडलेल्या खड्ड्यांमुळे प्रवास धोकादायक झाला आहे. त्यामुळे पुलावरील खड्डे बुजविण्याची मागणी जोर धरीत आहे.

तालुक्यातील लहान, मोठे कारखाने साजगाव ढेकू परिसरात आहेत. कारखानदारीमुळे या भागात अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते. शिवाय या भागातील ग्रामस्थ, विद्यार्थी, कामगार वर्गदेखील दररोज प्रवास करीत असतात. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत पाच किमीचा रस्ता आहे. आडोशी मार्गावर चिंचवली



गोहे येथे असलेल्या पुलावर मोठा खड्डा पडला आहे. अवजड वाहन जाऊन खड्ड्याचा आकार दिवसेंदिवस वाढत आहे. पाण्याने भरलेला खड्ड्याचा अंदाज न आल्याने छोटे-मोठे अपघात सातत्याने घडत आहेत.

याबाबत स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला धारेवर धरले आहे. अपघात होण्याची वाट न पाहता सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने डागडुजी करावी, अशी मागणी होत आहे.

**मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणे धोकेदायक बनले आहे. हा पूल केव्हाही कोसळून मोठा अपघात घडून जीवितहानी झाल्यावरच प्रशासनाचे डोळे उघतील.**
**-दिनेश पाटील, ग्रामस्थ**

**मागील काही दिवसांत सुरू असलेल्या पावसामुळे रस्त्याची डागडुजी करता आली नव्हती, परंतु आता तातडीने काँक्रीट वापरून खड्डा बुजवण्यात येईल.**
**-प्रशांत राखाडे, अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग खालापूर**

## मुरूडमध्ये महसूल सप्ताहानिमित्त उपक्रम

**मुरूड : प्रतिनिधी**

महसूल सप्ताह साजरा करण्याच्या अनुषंगाने तालुक्यात विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आलेले आहे.

२ ऑगस्ट रोजी वसंतराव नाईक महाविद्यालय येथे युवा संवाद कार्यक्रम, ३ ऑगस्ट रोजी नुकसनीचे पंचनामे पूर्ण करणे, दरडग्रस्त भागांना भेटी देवून पडताळणी करून प्रस्ताव पाठवणे, ४ ऑगस्ट रोजी शहरात स्वच्छता मोहीम, मंडळ स्तरावर फेरफार अदालत, रस्ते खुले करण्यासाठी गावस्तरावर बैठका, नागरिकांशी संवाद, ५ ऑगस्ट रोजी सैनिकांचा सन्मान तसेच त्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याकरिता बैठक, ६ ऑगस्ट रोजी शासकीय कर्मचारी यांचे सेवाविषयक बाबीकरीता विशेष मोहीम राबवुन महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार आहे.

# अंजुमन इस्लाम कॉलेजतर्फे वृक्षारोपण

**मुरूड : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून मेरी माती मेरा देश हा उपक्रम संपूर्ण देशात राबविण्यात येत आहे. त्या अनुशंगाने मंगळवारी (दि. १) राजपुरी येथील पठारावर अंजुमन इस्लाम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १०० विविध रोपट्यांची लागवड करण्यात आली आहे.

या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या वेळी सामाजिक वनीकरण विभागातर्फे संतोष रेवणे, वनपाल अंबोली, मिलिंद धुरी, वनरक्षक गारंबी व दिनेश रोटकर हे उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नितीन पवार व प्रा. अल्ताफ फकीर, मुख्य लिपिक जुहेफ मोदी व स्वयंसेवकांमध्ये



रय्यान हुक्केबदार, माज दाते, उसामा नखतारे, आवेज हवालदार, श्रेयश माळी, अकिफ सावरी, युसूफ मांडलेकर, मुफीझ शाबान, मतीन सुरती व अनस रामराजकर यांनी हा उपक्रम यशस्वी केला.

## निवडक



### गारमाळमध्ये स्मशानभूमीचे भूमिपूजन

**खोपोली** : घाटमाथ्यावर असलेल्या गारमाळ येथे स्मशानभूमीचे भूमिपूजन चावनीचे सरपंच बाळासाहेब आखाडे आणि उपसरपंच सुखदेव भोसले यांच्या हस्ते झाले. घाटमाथ्यावर हे गाव असल्यामुळे याठिकाणी असलेली स्मशानभूमी दरवर्षी पावसात सुटणाऱ्या वाऱ्यामुळे जमीनदोस्त होत होती. त्यामुळे येथील ग्रामस्थांना स्मशानभूमी नसल्याने पावसात अंत्यसंस्कार करावे लागत होते, मात्र आता याची दखल ग्रामपंचायतीने घेऊन रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आणि हिरानंदानी यांच्या सीएसआर फंडातून या ठिकाणी आरसीसी स्मशानभूमी बांधण्यात येणार आहे, जेणेकरून येथील ग्रामस्थांना भेडसावणारी समस्या दूर होणार आहे. या वेळी सरपंच बाळासाहेब आखाडे, उपसरपंच सुखदेव भोसले, हिरानंदानी कंपनीचे संजीव चौधरी, विशाल म्हात्रे, ग्रामस्थ बबन जानकर, शैलेश तुपे रघुनाथ आखाडे, निलेश चिंचावडे, सुभाष भोसले, संतोष शेडगे उपस्थित होते.

### वरसे ग्रामपंचायत येथे महसूल दिन



**रोहे** : तालुक्यातील वरसे ग्रामपंचायत कार्यालयात मंगळवारी (दि. १) महसूल दिन ग्रामस्थांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा आहे. या विभागामार्फत जास्तीत जास्त नागरिकांना सेवा व सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने १ ते ७ ऑगस्ट या कालावधीमध्ये महसूल सप्ताह साजरा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यामध्ये जिल्हास्तर, तालुकास्तर व गाव पातळीवर महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. वरसे येथील ग्रामपंचायतीच्या सभागृहात मंगळवारी महसूल दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास तहसीलदार किशोर देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, सरपंच नरेश पाटील, मंडळ अधिकारी भरत सावंत, ग्रामसेवक अशोक गुट्टे, तलाठी, कोतवाल व ग्रामस्थ मंडळ उपस्थित होते. कार्यक्रमात शासनाच्या विविध योजनांची माहिती तहसीलदार किशोर देशमुख यांनी दिली.

# महसूल दिनानिमित्त लोकोपयोगी उपक्रम राबविणार -तहसीलदार

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तहसील कार्यालयाच्या वतीने मंगळवारी (दि. १) महसूल सप्ताहाचा शुभारंभ उपजिल्हाधिकारी विठ्ठल इनामदार यांच्या उपस्थितीत करण्यात आला असून या निमित्ताने विविध उपक्रम राबविण्याचा मानस तहसीलदार आयुब तांबोळी यांनी व्यक्त केला.

खालापूर तालुका तहसील कार्यालयाच्या वतीने महसूल सप्ताहाचा शुभारंभ भूसंपादन उपजिल्हाधिकारी विठ्ठल इनामदार यांच्या विशेष उपस्थितीत करण्यात आला. या वेळी महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे फलक लावणे, लोकप्रतिनिधींशी संवाद साधून शेतीविषयी माहिती देणे, गाव चावडीवरही ऑनलाईन योजनांबाबत माहिती देणे, कार्यालय स्वच्छता व अभिलेख कक्ष अद्ययावत करणे, ई हक्क पोर्टल याचा प्रभावी वापर करणे, गाव तिथे स्मशानभूमी व दफनभूमी अशा उपक्रमांसह आठवडाभरात असे अनेक विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

महसूल सप्ताह दिनाचा पहिला दिवस असल्याने खालापूर तहसील कार्यालयातील कार्यरत अधिकारी, कर्मचाऱ्यांना गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले, तसेच खालापूर तहसील कार्यालयाच्या प्रांगणात अधिकारी यांनी स्वतः झाडू हाती घेऊन स्वच्छता मोहीम राबविण्यास सुरुवात केली. महसूल सप्ताह दिनाच्या शुभारंभाच्या वेळी तहसीलदार पूनम कदम, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, निवडणूक नायब तहसीलदार दशरथ भोईर, महसूल नायब तहसील विकास पवार यांचेसह खालापूर तहसील कार्यालयातील मंडळ अधिकारी, तलाठी, कोतवाल, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी इर्शाळवाडीच्या दुर्घटनेत मृत पावलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.





**माणगाव : महाड पंचायत समितीमध्ये आरोग्य अधिकारी तसेच ३४ वर्षे प्रदीर्घ सेवा करून विस्तार अधिकारी पदावरून नियमित वयोमानानुसार नुकत्याच सेवानिवृत्त झालेल्या माधुरी दत्तात्रय जाधव यांचे माणगावचे नगरसेवक अजित तारळेकर व ॲड. मयूर तारळेकर यांनी सन्मानपत्र देऊन अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.** (छाया : सलीम शेख)

## श्रीवर्धन सार्वजनिक वाचनालयाला १३० वर्षे पूर्ण

**श्रीवर्धन** : शहरातील ग्रामदेवता सोमजाई मातेच्या मंदिरासमोर श्रीवर्धन येथील सार्वजनिक वाचनालय आहे. या सार्वजनिक वाचनालयाला मंगळवारी (दि. १) १३० वर्षे पूर्ण झाली.

१ ऑगस्ट १८९३ साली श्रीवर्धन वाचनालयाची स्थापना करण्यात आली होती. वाचनालयाकडून दरवर्षी विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. वाचनालयामध्ये विविध विषयांवरील व विविध लेखकांची अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे रोजची वर्तमानपत्र देखील वाचनालयामध्ये वाचण्यासाठी ठेवलेली असतात. लहान मुलांसाठी बालविभाग आहे. भाजपचे जिल्हा चिटणीस मनोज गोगटे वाचनालयाच्या विविध कार्यक्रमांबाबत नेहमी जागरुक असतात.

# नेरळमधील अतिक्रमण घरे कायम करण्यासाठी निवेदन

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भगवान चंचे यांनी खासदार सुनील तटकरे यांची भेट घेत नेरळ शहरातील चिंचआळी परिसरातील अतिक्रमणात असलेली घरे कायम करण्याबाबतचे निवेदन येथील ग्रामस्थांच्या वतीने दिले आहे. कर्जत तहसील कार्यालयाकडून नेरळ चिंचआळी परिसरातील ६८ घरे गुरचरण जागेत बांधली असल्याने ही घरे अतिक्रमण निर्देशित असल्याचे नोटीस देण्यात आली होती. यानुसार येथील ग्रामस्थांची या जागेवरील घरे ही कायम करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.



कर्जत-कल्याण राज्यमार्गाला लागून असणाऱ्या चिंचआळी हा परिसर नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नंबर १५१मध्ये गुरचरण जागेवर वसलेले आहे. या गुरचरण जागेवर ६८ घरांना अतिक्रमण ठरवून कर्जत तहसीलदार कार्यालयाकडून नोटीस बजावण्यात आली आहे, मात्र येथील कुटुंबाची वस्ती गेले ४० ते ५० वर्षांपासून आहे. येथील कुटुंब त्याप्रमाणे नेरळ ग्रामपंचायतीला कर, घरपट्टी, पाणीबिल, वीजबिल त्याचबरोबर तहसील कार्यलयाकडून दंडात्मक लावलेले बिलदेखील येथील ग्रामस्थांनी महसूल विभागाला भरलेले आहे, परंतु आता येथील ग्रामस्थांना घरे पुन्हा हटवण्याच्या नोटीसा प्राप्त झाल्याने येतील ग्रामस्थ संकटात सापडले आहेत.

अलिबाग येथे झालेल्या जिल्हा नियोजन बैठकीत त्यांनी चिंचआळी येथील ग्रामस्थांचा प्रश्नदेखील उपस्थित केला. नेरळ ग्रामपंचायतीच्या गुरचरण जागेवरील अतिक्रमण घरे हे शासनाच्या मूल्यांकणानुसार पक्की करण्यात येऊन त्यांना सनद अर्थात मालकी हक्काचा पुरावा मिळावा म्हणून निवेदन देण्यात आले आहे. या संदर्भात खासदार तटकरे यांनी आपल्या शासनांकडून ग्रामस्थाना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे. या वेळी राष्ट्रवादीचे नेते एकनाथ धुळे, नेरळ शहर अध्यक्ष धनाजी गरुड यांसह येथील रहिवासी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तळे येथे नामदेव महाराज समाधी सोहळा उत्साहात

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

तळे येथील श्री देव राधाकृष्ण नामदेव शिंपी समाज यांच्या श्री राधाकृष्ण मंदिरात ६७३वा संतश्रेष्ठ श्री नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा मोठ्या उत्साहात व आनंदी व भक्तीमय वातावरणात पार पडला.

सकाळी श्रींची पूजा सालकरी व्यवस्थापक पवन रोहिदास रोडे यांचे हस्ते करण्यात आली. यानंतर हभप. महेंद्र बुवा कजबजे यांचे साथीदारांसह काकड आरती कार्यक्रम झाला. टाळ, मृदंगाच्या निनादात मधुर वाणीने पांडुरंगाचे नामस्मरण गोड अभंगाद्वारे सारा मंदिर परिसर दुमदुमून गेला होता.

शासकीय रक्तपेढी अलिबागच्या माध्यमातून युवक मंडळांनी रक्तदान शिबिर आयोजित केले होते. या वेळी ४२ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजसेवेला सहकार्य केले. या वेळी सतीश रामचंद्र मुद्राळे यांनी महाप्रसाद दिला असून ४५० भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यानंतर सायंकाळी विद्यार्थी गुणगौरव सोहळा, सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिक आणि विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

महिलांचे कार्यक्रम, रात्रौ भजन व शेजारतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. महिला मंडळातर्फे स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

# जसप्रीत बुमराहचे जंगी पुनरागमन

## आयर्लंडच्या दौऱ्यासाठी थेट कर्णधारपदाची धुरा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह याचे अखेर संघात पुनरागमन झाले. भारतीय संघाच्या आगामी टी-२० आयर्लंड दौऱ्यासाठी बीसीसीआयने संघ जाहीर केला आहे. यात मागील जवळपास एक वर्षापासून पाठीच्या दुखण्यामुळे त्रस्त असलेल्या बुमराहला थेट कर्णधारपद देण्यात आले आहे, तर उपकर्णधारपदाची माळ मराठमोळ्या ऋतुराज गायकवाडच्या गळ्यात पडली आहे.



अलिकडेच बीसीसीआयने बुमराहबद्दल हेल्थ अपडेटदेखील जारी केले होते. तो बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये त्याच्या पूर्ण क्षमतेने गोलंदाजी करीत आहे आणि लवकरच पुनरागमन करू शकतो असे यात सांगण्यात आले होते. त्यानंतर बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी दोन दिवसांपूर्वीचे बुमराहच्या पुनरागमनाचे संकेत दिले. त्यानुसार आयर्लंड दौऱ्यावर बुमराहचे पुनरागमन झाले आहे.

या वर्षी मार्चमध्ये बुमराहच्या पाठीवर शस्त्रक्रिया झाली आणि गेल्या सप्टेंबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या घरच्या टी-२० मालिकेनंतर तो एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही. बंगळुरू येथील नॅशनल क्रिकेट अकादमीच्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी केलेल्या टाईमलाईननुसार बुमराह आधी ३० ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या आशिया चषकासाठीच परतण्याची अपेक्षा होती, मात्र बीसीसीआयने मेडिकल अपडेट जारी करून बुमराह लवकरच तंदुरुस्त होण्याची आशा व्यक्त केली होती. त्यानुसार त्याचे कमबॅक झाले आहे.

भारताला पुढील महिन्यात १८ ऑगस्टपासून आयर्लंडविरुद्ध तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळायची आहे. दुसरा सामना २० ऑगस्टला आणि तिसरा सामना २३ ऑगस्टला खेळवला जाईल. तिन्ही सामने डब्लिनच्या द व्हिलेज स्टेडियमवर होतील.

अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीने आशिया चषक आणि विश्वचषक पाहता या टी-२० मालिकेत काही वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती दिली आहे. त्याचबरोबर काही आयपीएल स्टार्सनाही या मालिकेत खेळण्याची संधी देण्यात आली आहे.

**असा आहे संघ :**

जसप्रीत बुमराह (कर्णधार), ऋतुराज गायकवाड (उपकर्णधार), यशस्वी जैस्वाल, टिलक वर्मा, रिंकू सिंग, संजू सॅमसन (विकेटकीपर), जितेश शर्मा (विकेटकीपर), शिवम दुबे, वॉशिंग्टन सुंदर, शाहबाज अहमद, रवी बिश्नोई, प्रसीध कृष्णा, अर्शदीप सिंग, मुकेश कुमार, आवेश खान.

# आयपीएलचा पुढील हंगाम विदेशात होण्याची शक्यता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

क्रिकेट चाहत्यांसाठी आयपीएलबाबत एक मोठी बातमी आहे. इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२४ परदेशातही होण्याची शक्यता आहे. याचे मुख्य कारण म्हणजे पुढील वर्षी होणारी लोकसभेची निवडणूक, मात्र अद्याप भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून (बीसीसीआय) याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

सूत्रांच्या माहितीनुसार बीसीसीआय लवकरच आयपीएल २०२४चे आयोजन करू शकते. मार्चमध्ये स्पर्धा खेळली जाऊ शकते. त्याचा अंतिम सामना मे महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात होऊ शकतो, पण लोकसभा निवडणुकीमुळे आयपीएलवर परिणाम होऊ शकतो. त्याचप्रमाणे सध्या संपूर्ण लक्ष यंदाच्या विश्वचषकावर आहे. त्यानंतरच कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतला जाईल.

बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने 'इनसाइडस्पोर्ट'ला सांगितले की, होय, आम्हाला पुढील आयपीएलमध्ये येणाऱ्या अडचणींची जाणीव आहे. आमच्याकडे जूनमध्ये इंग्लंडची मालिका आणि त्यानंतर सार्वत्रिक निवडणुका तसेच विश्वचषक आहे, पण आता काहीही नियोजन करणे खूप घाईचे आहे. ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या विश्वचषकाच्या यशस्वी आयोजनाकडे आपल्या सर्वांचे लक्ष आहे. डिसेंबर-जानेवारीमध्येच कोणताही निर्णय घेतला जाईल.

**याआधीही प्रयोग**

आयपीएलचा पुढचा सीझन लवकर पार पाडण्याबरोबरच परदेशातही त्याचे आयोजन होण्याची शक्यता आहे, मात्र भारतालाच प्राधान्य दिले जाईल. याआधीही परदेशात आयपीएलचे आयोजन करण्यात आले आहे. २००९मध्ये लोकसभा निवडणुकीमुळे दक्षिण आफ्रिकेला आयपीएलचे यजमानपद देण्यात आले होते. त्याचवेळी २०१४च्या लोकसभा निवडणुकीमुळे त्याचे काही सामने यूएईमध्ये खेळले गेले होते. त्यानंतर काही सामने भारतात झाले. लोकसभा निवडणूक २०२४च्या एप्रिल आणि मे महिन्यात होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

# जिल्हा फुटबॉल स्पर्धेत मुलांच्या गटात बालभारती प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत पनवेल महानगरपालिका व जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धा२०२३-२४ ही स्पर्धा कामोठे येथील इंडो स्कॉट शाळेमध्ये सुरू आहे. ही स्पर्धा १४ मुले व १७ वर्षे मुली अशा दोन गटांत खेळली गेली. स्पर्धेच्या अंतिम सामन्यामध्ये १४ वर्षांखालील मुलांच्या गटात बालभारती शाळेने प्रथम क्रमांक पटकाविला.





क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे व विभाग प्रमुख नामदेव पिचड यांनी या ठिकाणी मंगळवारी (दि. १) भेट देऊन स्पर्धेत सहभागी झालेल्या शाळांचे अभिनंदन करीत, स्पर्धेकरिता आलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या वेळी क्रीडा शिक्षक समीर रेवाळे व विशाल यादव, रोहित म्हस्के, शाळेचे क्रीडा विभाग प्रमुख हर्षा उल्लाल, इतर क्रीडाशिक्षक, शाळेचे सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अतिरीक्त आयुक्त २ भारत राठोड यांनी या स्पर्धेत सहभागी झालेल्या शाळांचे अभिनंदन केले. पनवेल महानगरपालिका जिल्हा स्तरीय शालेय जिल्हा क्रीडा स्पर्धांना स्पर्धकांचा मोठा प्रतिसाद लाभत असून सुमारे ६० शाळांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी आलेले विद्यार्थीदेखील मोठ्या उत्साहात असल्याचे या वेळी दिसून येत होते.

१४-१७ वयोगटातील मुले व मुलींसाठी होणाऱ्या या स्पर्धेंतर्गत पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध शाळा व कनिष्ठ विद्यालयातील सुमारे ६० संघांनी सहभाग घेतला आहे. १८ जुलै रोजी सीकेटी महाविद्यालयात या स्पर्धांचा शुभारंभ झाला होता.

या स्पर्धांचा शेवटचा सामना इंडो स्कॉट शाळेमध्ये घेण्यात आला. स्पर्धेच्या अंतिम सामन्यामध्ये १४ वर्षांखालील मुलांच्या गटात बालभारती शाळेने पहिला नंबर पटकाविला. या ठिकाणी १४ वर्षांखालील मुले, १७ वर्षांखालील मुली, अशा दोन गटात या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेतील विजेते संघ पुढे विभागीय स्तर, राज्य स्तर आणि राष्ट्रीय स्तरावर खेळावयास जाणार आहेत.

# युवराज सिंगने ब्रॉडला दिल्या खास शुभेच्छा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा वेगवान गोलंदाज स्टुअर्ट ब्रॉडने निवृत्ती जाहीर केली आहे. ब्रॉडच्या निवृत्तीवर माजी भारतीय क्रिकेटर युवराज सिंगने एक खास पोस्ट शेअर केली आहे. सोशल मीडियावर फोटो शेअर करण्यासोबतच त्याने मजेशीर कॅप्शनही लिहिले आहेत. ब्रॉडला निवृत्तीनिमित्त शुभेच्छा देताना युवराजने त्याला महान क्रिकेटपटूचा दर्जा दिला आहे.

युवराजने पोस्टमध्ये लिहिले की, अविश्वसनीय कसोटी कारकीर्दीबद्दल अभिनंदन! तुम्ही सर्वोत्तम आणि धोकादायक कसोटी गोलंदाजांपैकी एक आहात. एक महान खेळाडूदेखील आहात! तुमचे करिअर आणि जिद्द तरुणांसाठी प्रेरणादायी ठरेल. आपल्याला शुभेच्छा!

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त बॅडमिंटन स्पर्धा

**पनवेल : प्रतिनिधी**

भाजपचे मावळ लोकसभा प्रमुख तथा लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व बॅडमिंटन असोसिएशन ऑफ रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने उलवा नोडमध्ये ४ ते ६ ऑगस्टपर्यंत रामशेठ ठाकूर बॅडमिंटन ट्रॉफी २०२३ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



खेळाडूंच्या कलागुणांना वाव मिळावा व उत्कृष्ट खेळाडू निर्माण व्हावेत, यासाठी रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व बॅडमिंटन असोसिएशन ऑफ रायगड यांच्या वतीने अनेक उपक्रमे राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

उलवा नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये ही स्पर्धा होणार असून ११, १३, १५ व १७ वर्षाखालील मुले आणि मुली गटात तसेच महिला व पुरुष खुला गट अशा प्रकारात होणार आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना चार लाख रुपयांची बक्षिसे देण्यात येणार असून प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ क्रमांकास सन्मानचिन्ह व पारितोषिक रक्कम देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

# शुबमन गिलने रचला इतिहास

## पहिल्या कमी डावांमध्ये सर्वाधिक धावा करणारा बनला फलंदाज

**मुंबई : प्रतिनिधी**

तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील दुसऱ्या सामन्यात वेस्ट इंडिजने भारताचा पराभव केला आणि मालिका १-१ अशी बरोबरीत आणली. या सामन्यात भारताचा युवा फलंदाज शुबमन गिलने एक खास कारनामा केला आहे.



युवा सलामीवीर शुबमन गिलने वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या वनडे सामन्यात गिलने ३४ धावा केल्या. या खेळीच्या जोरावर त्याने पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमला मागे टाकत एकदिवसीय क्रिकेटमध्ये विश्वविक्रम केला आहे. शुबमन आता पहिल्या २६ डावांनंतर वनडेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला आहे.

दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात वेस्ट इंडिजने भारतावर सहा गडी राखून विजय मिळवला. या सामन्यात गिलने ४० चेंडूंत पाच चौकारांच्या मदतीने ३४ धावा केल्या. या खेळीच्या जोरावर त्याने कारकिर्दीतील २६व्या वनडेमध्ये १३५२ धावा पूर्ण केल्या आहेत. २६ डावांनंतर शुबमन वनडेत सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या यादीत अव्वलस्थानी आला आहे. त्याने पहिल्या २६ डावात १३२२ धावा करणाऱ्या बाबर आझमला मागे टाकले आहे.

# लहानग्या चाहतीने विराटला दिली भेटवस्तू



**बार्बाडोस : वृत्तसंस्था**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना बार्बाडोस येथे खेळला गेला. विराट कोहली आणि रोहित शर्मा या सामन्यात भारतीय प्लेइंग इलेव्हनचा भाग नव्हते, पण विराट कोहलीचा एक व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

विराटने बार्बाडोसमध्ये चाहत्यांची भेट घेतली. विराट मैदानावर आक्रमक आहे, तितकाच तो मैदानाबाहेर शांत आणि संयमी आहे. त्याच्या चाहत्यांवर तो प्रेम करतो आणि त्यांच्या भावनांची पूर्ण काळजी घेतो. शनिवारी दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात कोहलीला एका छोट्या चाहतीने एक खास भेटवस्तू दिली, जी विराट कोहलीने मनापासून स्वीकारली.














दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com